MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष चोविसावे / अंक ३ / मार्च २०२३

## संपादकीय

### बहुविध बुद्धिमत्ता

फेब्रुवारी महिन्यात १२ वीची तर मार्च महिन्यात १० वीची परीक्षा सुरू झाली. या दोन्ही परीक्षांना आपल्या देशात फारच महत्त्व आहे. त्यामुळे या परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याची सर्वच विद्यार्थ्यांची धडपड असते. यामध्ये पालक देखील सहभागी झालेले असतात. वर्षभर खेळ आणि मनोरंजन कार्यक्रमांना सोडचिठ्ठी देऊन ही मुले अभ्यासाच्या घाण्याला जुंपलेली असतात. परीक्षेचे कौशल्य विकसित करण्यासाठी कोचिंग क्लासची मदत घेतली जाते. घरातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सतत मार्गदर्शन करीत असतात. आजूबाजूला राहणारे लोक हे महत्त्वाचे वर्ष आहे असे पुन्हा पुन्हा सांगत असतात. त्यामुळे मनावर ताण घेऊनच ही मुले परीक्षेला आलेली असतात. सगळेजण आपापल्या कुवतीप्रमाणे उत्तर पत्रिका लिहितात. त्यानंतर आपल्याला अपेक्षित यश मिळणार नाही या भीतीने काही विद्यार्थी निकाल लागण्याच्या आधीच आत्महत्या करतात. बहुसंख्य विद्यार्थी निराशेने ग्रासून निकालाची वाट पाहात असतात. जेव्हा निकाल लागतो तेव्हा कमी गुण मिळाले तर संपूर्ण घरात निराशेचे वातावरण पसरते. 'आता पुढे काय?' याची चर्चा सुरू होते. हे चित्र आपण वर्षानुवर्षे पाहात आलो आहोत.

शालांत परीक्षेत मिळणारे यश म्हणजे सर्वस्व नसते. पाठ्यपुस्तकात लिहिलेली माहिती लक्षात ठेवून परीक्षेच्या वेळी ती अचूक शब्दात आणि ठरलेल्या अवधीत उत्तर पत्रिकेत लिहिणे हे एक कौशल्य आहे. हे कौशल्य बुद्धिमत्तेचा एक पैलू दाखविते. पण हे एकमेव कौशल्य म्हणजेच बुद्धिमत्ता असे जे समीकरण आपल्या समाजात झाले आहे ते बरोबर नाही. बुद्धिमत्तेचे अनेक पैलू आहेत. त्याला 'बहुविध बुद्धिमत्ता' (Multiple Intelligence) असे म्हणतात. हॉवर्ड गार्डनर (Howard Gardner) या अमेरिकन मानसशास्त्रज्ञाने 'बहुविध बुद्धिमत्ता' या विषयावर सखोल संशोधन करून आपले मत मांडले आहे. त्याच्या मते बुद्धिमत्तेचे मुख्य आठ प्रकार पडतात.

**१. दृश्य-स्थानिक (Visual - Spatial Intelligence)**

एखादी ओळखीची व्यक्ती आपल्याला अचानक भेटली की तिचा चेहरा आपल्या लक्षात येतो. परंतु नाव मात्र आठवत नाही. तसेच, एखाद्या ठिकाणी आपण आधी गेलो असलो की आपल्याला वाट बरोबर सापडते. तिथे जावे कसे? याचे वर्णन मात्र करता येत नाही. ही दृश्ये 'स्थानिक बुद्धिमत्ता' असल्याची लक्षणे आहेत. अशी बुद्धिमत्ता असलेल्या व्यक्ती नकाशाचे अचूक वाचन करू शकतात. त्यांना दिशा चांगल्या कळतात. अशा मंडळींना चित्रकलेत

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

गती असते. ही बुद्धिमत्ता असलेल्या व्यक्ती उत्तम वास्तू विशारद किंवा अभियंते होऊ शकतात.

**२. भाषिक – शाब्दिक बुद्धिमत्ता (Linguistic - Verbal Intelligence)**

ही बुद्धिमत्ता ज्यांच्या अंगी आहे त्यांचे भाषेवर प्रभुत्व असते. ते आपले विचार प्रभावीपणे मांडू शकतात. मध्ये मध्ये शाब्दिक कोट्या करणे यांना सहज जमते. भाषेतील शब्दभांडार त्यांना उपलब्ध असते. त्यांच्या आधारे ते चांगले लेखन करू शकतात. यशस्वी लेखक, शिक्षक, वकील, पत्रकार, आणि राजकारणी यांच्या कौशल्यांचा जर आपण विचार केला तर त्यांच्या अंगी भाषिक-शाब्दिक कौशल्य असल्याचे आपल्या सहज लक्षात येईल.

**३. तार्किक–गणिती बुद्धिमत्ता (Logical-Mathematical Intelligence)**

एखाद्या घटनेकडे तार्किक दृष्टीने बघण्याची क्षमता अशा लोकांमध्ये असते. समस्येचे विश्लेषण करून ते त्यावर उत्तम तोडगा काढू शकतात. अशा व्यक्ती विज्ञान क्षेत्रात यशस्वी होतात. तसेच गणितात त्यांना चांगली गती असते. वैज्ञानिक, गणितज्ञ, इंजिनीयर, कॉम्प्युटर प्रोग्रामर वगैरे लोक या गटात मोडतात.

**४. शारीरिक बुद्धिमत्ता (Bodily - Kinesthetic Intelligence)**

या गटातील व्यक्ती आपल्या शरीराची वेगाने हालचाल करू शकतात. त्यांच्या शरीरावर त्यांचे प्रचंड नियंत्रण असते. मेंदू आणि शरीराचे इतर अवयव यामध्ये उत्तम समन्वय असणे हे या मंडळींचे वैशिष्ट्य असते. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात ही मंडळी यशस्वी होतात. यशस्वी खेळाडू, नृत्यकार, शिल्पकार अशा लोकांना शारीरिक बुद्धिमत्तेचे वरदान लाभलेले असते.

**५. सांगीतिक बुद्धिमत्ता (Musical Intelligence)**

संगीताची जाण असलेले हे लोक असतात. संगीताची चाल, धून, ताल या बाबी अशा लोकांच्या सहज लक्षात राहतात. तसेच नवनवीन चाली ते निर्माण करू शकतात. वाद्यांबद्दल त्यांच्यात उपजतच आवड असते. हे लोक एखादे वाद्य वाजवायला लवकर शिकतात. यशस्वी गायक, संगीतकार, वाद्य वादक यांच्या मध्ये सांगीतिक बुद्धिमत्ता असते. त्यांच्या भरोशावर ही मंडळी संगीत क्षेत्रात नवनिर्मिती करू शकतात.

**६. आंतरवैयक्तिक बुद्धिमत्ता (Interpersonal Intelligence)**

अशा मंडळींना आजूबाजूच्या लोकांशी सहज संवाद साधता येतो. लोकांच्या भावभावना ते समजून घेऊ शकतात. त्यांच्या समस्यांवर ते तोडगा काढू शकतात. तसेच, दोन व्यक्तींमधील वाद ते मिटवू शकतात. माणसे जोडण्याचे कसब अशा व्यक्तींमध्ये असते. त्यामुळे त्यांच्या मित्रपरिवार खूप मोठा असतो. आपल्या मित्रांशी संपर्क ठेवणे, त्यांच्या अडीअडचणीची चौकशी करणे, त्यांच्या मदतीला धावून जाणे अशी कामे ही मंडळी आनंदाने करीत असतात. त्यामुळे ती समाजात लोकप्रिय असतात. बहुसंख्य राजकारणी मंडळी या गटात मोडतात. त्याचबरोबर सामाजिक कार्य करणारे लोक देखील आंतरवैयक्तिक बुद्धिमत्ता लाभलेले असतात. अशी बुद्धिमत्ता असलेले लोक यशस्वी समुपदेशक होऊ शकतात. यशस्वी विक्रेता होण्यासाठी देखील याच बुद्धिमत्तेची गरज असते.

**७. अंतवैयक्तिक बुद्धिमत्ता (Intrapersonal Intelligence)**

अशा बुद्धिमत्तेचे लोक स्वतःमध्येच हरवलेले असतात. अंतर्मुख होऊन ही मंडळी आपली बलस्थाने काय आहेत आणि आपल्यात उणिवा

(पृष्ठ क्र. ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष चोविसावे/अंक ३/मार्च २०२३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक ९ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | गांधीजी व विनोबाजी यांच्या विचारांचे मूळ भारतीय तत्त्वज्ञानात | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | २ |
| ३) | साहित्य संमेलन - एक ऊर्जा स्रोत | वृंदा टिळक | ७ |
| ४) | मराठी भाषा गौरव दिन | राजेश कुलकर्णी | ११ |
| ५) | आपल्या इतिहासाची मोडतोड कोणी केली? | संतोष कारखानीस | १४ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | १६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# गांधीजी व विनोबाजी यांच्या विचारांचे मूळ भारतीय तत्त्वज्ञानात

*वर्धा येथे दिनांक ३ ,४, ५ फेब्रुवारी २०२३ रोजी संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील गांधीजी व विनोबाजी आजच्या परिप्रेक्षात या परिसंवादातील डॉ प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी यांनी दिलेले व्याख्यान - संपादक*



९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला उपस्थित असलेल्या आत्मीय बंधूंनो, नमस्कार!

पुणे येथे संपन्न झालेल्या ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात ; ज्याचे अध्यक्ष ज्येष्ठ समीक्षक द. भि. कुलकर्णी होते ; त्या संमेलनात विद्यार्थी म्हणून मला सहभागी होता आलं आणि आज वक्ता म्हणून 'गांधीजी आणि विनोबाजी वर्तमानाच्या परिप्रक्षात' या विषयावरील परिसंवादात सहभागी होत आहे या विलक्षण योगाने माझे हृदय गदगद झाले असून, मी आयोजकांचे मला बोलावल्याबद्दल आभार मानतो.

सुरुवातीला मला हे नमूद करायचे आहे की, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील गांधीजी व विनोबाजी आजच्या परिप्रेक्षात या सत्राचे अध्यक्षपद डॉ. विनय सहस्रबुद्धे भूषवणार असल्यामुळे काही वर्तमानपत्रांनी व काही व्यक्तींनी गांधी आणि विनोबा यांची मांडणी संघ परिवारातील व्यक्ती करत असल्यामुळे अस्वस्थता व्यक्त केली होती. ती बातमी वाचून मला आश्चर्य वाटलं. 'जय जगत' चा नारा देणाऱ्या विनोबा आणि गांधींवर काही विशिष्ट लोकांची मक्तेदारी नसावी असे मला वाटते. संत तुकारामांनी म्हटलं आहे 'संकोचोनी काय झालासी लहान। घेई अपोशन ब्रह्मांडाचे।।'




आयोजकांनी आम्हा वक्त्यांची निवास व्यवस्था पूज्य गांधीजींच्या सानिध्याने पावन झालेल्या सेवाग्राम येथे केली असल्यामुळे तो परिसर अत्यंत डोळसपणे मला पाहता आला. विनोबांनी लिहिलेल्या 'गीताई'चे सर्व श्लोक जिथे करून ठेवले आहेत त्या गीताई मंदिराचे दर्शन घेता आले. या दोन्ही ठिकाणी भेट दिल्यामुळे व्याख्यानासाठी काढलेली टिपणे एका अर्थाने जिवंत झाली असे मला वाटते.

काल सेवाग्राम आश्रमामध्ये जपान वरून आलेले इकिदा नावाचे एक बौद्ध भिक्खू मला भेटले. त्यांच्याशी संवाद साधताना असे समजले की, ते दरवर्षी सेवाग्राम मध्ये तीन दिवस विश्वशांतीची प्रार्थना करण्यासाठी येतात. मी २०१९ मध्ये जपान दौऱ्यावर असताना निशीदातसु फुजी या जपानी बौद्ध तत्त्वज्ञ व गांधीजींच्या भेटी संदर्भात व तसेच त्यांनी गांधीजींना भेट दिलेल्या तीन माकडांचे संदर्भ ताजे झाले. या वरूनच गांधीजी यांचे विचार समायोजित आहेत असे मला वाटते.

प्रत्येक घरात मनुष्य जन्माला येतो, पण कुठेतरी 'माणुसकी' जन्म घेते.

खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण अर्थात 'खाऊजा' मुळे अमेरिकेत व युरोपात प्रचंड विषमता वाढली. विषमतेतून बाहेर पडणे हा जगासमोरील मोठा प्रश्न उभा राहिला. थॉमस पिकेटी व जोसेफ स्टीग्लिट्स यांनी या विषयाचं सिद्धांतन केलं आहे. जोसेफ स्टीग्लिट्सच्या पुस्तकाचे नावच मुळी 'ग्रेट डिव्हाइड' असे आहे. सर्वांना चिंता आहे की 'जर सर्व संपत्ती काही मूठभर लोकांच्या हातात एकवटली व जनसामान्यांकडे काहीच उरले नाही तर माणसाचं भविष्य काय?' याबाबतीत गांधीजी व विनोबाजी यांचे विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. या दोघांनीही म्हटलं की, ''विषमतेची मूळं मानवी प्रवृत्तीत आहेत. भांडवलदार व्यक्ती नसून भांडवलदार ही 'वृत्ती' आहे. ही वृत्ती जोपर्यंत संपुष्टात येत नाही तोपर्यंत जगासमोरील समस्यांचे निराकरण होणार नाही.'' ज्येष्ठ तत्त्वचिंतक डॉ अशोक मोडक यांनी अशी मांडणी केली आहे की; ''व्यक्तीचे षड्रिपू अर्थात काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे आहेत. यातील काम, मोह आणि लोभ हे तीन षड्रिपू भांडवलशाहीने घेतले व क्रोध, मद आणि मत्सर हे मार्क्सवादाने घेतले. याचा परिणाम असा झाला की, सोवियत संघ व चीनने पायाभूत व रचनात्मक सुधारणा (स्ट्रक्चरल रिफॉर्मस) करायला सुरुवात केली. मानवी प्रवृत्तीचे आकलन करण्यास भांडवलशाही व मार्क्सवाद कमी पडला.''

१८७० मध्ये हर्बर्ट स्पेन्सरने कार्ल मार्क्सला म्हटलं होतं की, 'जोपर्यंत माणूस बदलत नाही तोपर्यंत केवळ सत्ता भांडवलदारांकडून घेऊन कामगारांच्या हातात दिली म्हणजे दुधा-मधाच्या नद्या वाहतील असं जे तुम्हाला वाटतं हा केवळ भ्रम आहे'. हेच वाक्य मॅक्झिम गॉर्कीने बोलशेविक क्रांतीच्या काळात लेलिनला ऐकवलं व डॉक्टर लोहिया यांनी १९४३ मध्ये 'इकॉनॉमिक्स आफ्टर मार्क्स' या पुस्तकात मांडलं. गांधी व विनोबा हेच सांगत होते !

सगळ्या बाबतीत मानवी मनाला विशेष स्थान देणं फार महत्त्वाचं आहे. मन बदललं तर माणूस बदलणार. ज्याला 'मन' नाही तो मनुष्यच नाही. मन निष्कारुण, शोषक व जुलमी बनलं तर काय होतं याचे पुरावे ग्रेट ब्रिटनच्या औद्योगिक क्रांतीनंतरच्या कालखंडात आपल्याला पाहायला मिळतात. १७६० ते १८३० हा इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीचा काळ आहे. इंग्रजीतील ज्येष्ठ कादंबरीकार चार्लस डिकन्स यांच्या ऑलिव्हर ट्विस्ट या जगप्रसिद्ध कादंबरीत दारिद्र्याचे चित्रण करण्यात आले आहे. औद्योगिक क्रांती नंतर सहा दशकांनी म्हणजे १८९३ मध्ये स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेचा प्रवास केला आहे. विवेकानंदांनी या औद्योगिक क्रांतीच्या परिणामांवर कठोर शब्दात ताशेरे ओढले आहेत. विवेकानंद म्हणतात की, ''तुम्ही इतके क्रूर बनला की, तुम्ही येशू ख्रिस्तालाही जमीन देणार नाही.'' औद्योगिक क्रांतीमुळे संपत्तीचे अभिसरण सर्वदूर न झाल्यामुळे फार मोठे प्रश्न उभे राहिले व त्याला उपाय स्वामी विवेकानंदांनी भारतीय चिंतनामध्ये शोधला.

स्वामी विवेकानंदांनी मांडलेला हा विचार गांधीजींनी व विनोबांनी पुढे नेला, कारण यांच्या विचारांची बीजं भारतीय आहेत. ती बीजं इशावास्योपनिषदात आहेत.

ईशा वास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद्धनम्।।

''तेन त्यक्तेन भुञ्जीथा'' हे तीन शब्द गांधी व विनोबांना अत्यंत प्रिय होते. गांधींनी याचे भाषांतर



'रीनाउन्स अँड एन्जॉय' (Renounce and enjoy)असं केलं. आधी त्याग करायचा व त्यानंतर साक्षी भावाने त्याचा आनंद घ्यायचा असा विचार यामध्ये अनुस्युत होता; मात्र आपण सध्या फक्त एन्जॉय करतो; म्हणून असं वाटतं की, भांडवलशाही व मार्क्सवाद या दोघांनाही बाजूला ठेवून भारतीय चिंतनाला केंद्रीभूत करून पुढे जावे लागेल. हा विचार आजच्या परिप्रेक्षात गांधी व विनोबा देतात. आपण शांतपणे विचार केला तर कळेल की, जेव्हा सोवियत संघ कोसळला तेव्हा अमेरिकेने दवंडी पिटवली होती की, 'आता आम्हीच श्रेष्ठ आहोत', 'जितं मया', 'एंड ऑफ हिस्टरी' वगैरे वगैरे. पण प्रत्यक्षात काय झालं? २००८ साली लेहमन क्रायसिस आलं आणि अमेरिकेच्या भांडवलशाहीचा डोलारा कोसळला. डेरिव्हेटिव्ह ही कल्पनाच भयानक आहे. कारण त्यामध्ये कष्टाविना कमाई आहे. गांधीजींनी सात पापं सांगितले आहेत; त्यामध्ये 'कष्टाविना कमाई' हे एक पाप सांगितले. कष्टाविना कमाई, विवेकाशिवाय आनंद, मानवतेविना विज्ञान, चारित्र्याविना ज्ञान, तत्त्वाविना राजकारण, नीतीविना व्यवसाय आणि त्यागाशिवाय पूजा ही ती सात पापे आहेत. याचं व्यवस्थित आकलन केल्यानंतर आजच्या पिढीला मार्ग सापडू शकतो.

या विषमतेवर उपाय म्हणजे ज्यांच्याकडे सत्ता व संपत्ती आहे त्यांच्यातील माणुसकी जागवली पाहिजे. त्यांना देण्याचा आनंद शिकवला पाहिजे. विनोबाजींनी भूदान चळवळीमध्ये लाखो एकर जमीन गरिबांना मिळवून दिली. प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणातील चांगुलपणाला साद घालत पुढे जाणे हाच मार्ग आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये परमेश्वराचं अधिष्ठान आहे हा भगवद्गीतेने सांगितलेला विचार गांधी व विनोबांनी मांडला. ज्येष्ठ कवी दत्ता हलसगीकर यांच्या ओळींमध्ये सांगायचं झालं तर -

ज्यांची बाग फुलून आली
त्यांनी दोन फुले द्यावीत
ज्यांचे सूर जुळून आले
त्यांनी दोन गाणी द्यावीत

आभाळाएवढी ज्यांची उंची
त्यांनी थोडेसे खाली यावे
मातीत ज्यांचे जन्म मळले
त्यांना उचलून वरती घ्यावे !

सेवाग्राम आश्रमामध्ये गांधींनी मांडलेल्या अकरा व्रतांचा फलक काल पाहिला. आश्रमात राहणाऱ्या प्रत्येकाने ही ११ व्रते पाळणे बंधनकारक होते. या ११ व्रतांना विनोबाजींनी छंदोबद्ध केले आहे. ते असं -

अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन। सर्वधर्मसमानत्व स्वदेशी स्पर्शभावना । ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये ।।

असंग्रह म्हणजे कुठल्याही गोष्टींचा गरजेपेक्षा जास्ती संग्रह करू नये हा विचार गांधी व विनोबा यांना अभिप्रेत होता. या अकरा व्रतांची मुळे पतंजलीच्या योगसूत्रांमध्ये आपल्याला पाहायला मिळतात. म्हणूनच विनोबा व गांधी यांचे चिंतन हे अस्सल भारतीय आहे.

विनोबा भावे वद्य पक्षाला फार महत्त्व देत असत. त्यांच्या जीवनातील एक प्रसंग आहे. पहाटे साडे-तीनला उठून पदयात्रा करण्यासाठी ते निघत असत. त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी सत्याग्रही दादा धर्माधिकारी देखील चालत असत. एकदा वद्य पक्षात पहाटे साडे-तीनला उठून विनोबा व दादा धर्माधिकारी चालायला निघतात. सगळीकडे काळाकुट्ट अंधार व हातात कंदील असे ते दृश्य होते. दादा धर्माधिकारींनी म्हटलं की, 'विनोबा, वद्य पक्षात आपण पदयात्रा बंद ठेवली तर आभाळ कोसळेल का? कारण अंधारामध्ये काटेकुटे खाचखळगे असतात, रस्त्यात अडचणी असतात.' विनोबा उत्तरले, 'दादा मला क्षमा करा, पण 'शुद्ध पक्षा'पेक्षा 'वद्य पक्ष' मला आवडतो. पौर्णिमेपेक्षा मला

अमावस्या प्रिय वाटते; याचं कारण, या काळोख्या रात्री काजव्यालाही चमकता येतं. काजव्याची पण काळजी करणारे अंत्योदयी तत्त्वज्ञान विनोबांनी मांडलं. संत ज्ञानेश्वरांनी देखील हेच तत्त्वज्ञान मांडले आहे.

जो अविद्याराती रुसोनिया ।
गिळी ज्ञानाज्ञान चांदनीया ।
तो सुदिनु करी ज्ञानिया । आत्मबोधाचा ।।

शेवटच्या व्यक्तींपर्यंत कल्याणाचा मार्ग घेऊन जाणे हे भारतीय तत्त्वज्ञान शिकवतं. म्हणून डम स्मिथने सांगितलेला स्व-हितरत माणूस बाजूला ठेवा आणि विनोबांच्या गीताई मधील 'सर्वभूतहितेरता:' असा माणूस आपण प्रतिमान म्हणून ठेवला पाहिजे. व्यष्टीने केवळ समष्टीवर नव्हे, तर सृष्टी व परमेष्टीवर देखील प्रेम केलं पाहिजे. व्यष्टी आणि सृष्टी यांच्यामधील हे जैव नातं आहे; त्याचा विसर पडल्यामुळेच आपण पर्यावरणाची नासधूस करत आहोत.

वर्धा जवळील आर्वी येथे जन्मलेले ज्येष्ठ तत्त्वचिंतक दत्तोपंत ठेंगडी यांनी देखील गांधीजींच्या खादी, स्वदेशी, अस्पृश्यता निवारण, कुटिरोद्योग, ग्रामविकास या रचनात्मक कामाची प्रशंसा केलेली आहे.

विनोबा भावे यांची 'आचार्यकुल' ही संकल्पना खूप महत्त्वाची आहे. 'शिक्षण विचार' या शीर्षकाचे विनोबांचे पुस्तक वाचनीय आहे. या देशाच्या शिक्षणाचा प्रश्न शिक्षकांनी हाती घ्यावा; देशाला कशाप्रकारचे शिक्षण मिळावं याचा निर्णय शिक्षकांनी करावा असे विनोबा म्हणत असत. आचार्यत्व व ज्ञाननिष्ठा हे दोन शब्द त्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते. विनोबाजी म्हणत असत की, 'शिक्षक विद्यार्थीपरायण असावा, विद्यार्थी शिक्षकपरायण असावा, दोघेही ज्ञानपरायण असावेत व ज्ञान सेवापरायण असावे.' हे अत्यंत महत्त्वाचे सूत्र आपण लक्षात घेतले पाहिजे. विनोबा स्वतः एक तेजस्वी छात्र व आजीवन विद्यार्थी म्हणूनच जगले. त्यांची शिक्षकांप्रती आपुलकी व अपारनिष्ठा होती. ज्ञान सेवा परायण असणं फार महत्त्वाचं आहे. 'कैवल्यप्राप्ती झाल्यानंतर देखील समाजासाठी परत लोकसंग्रह करावा' हा ज्ञानोत्तर भक्तीचा विचार संत ज्ञानेश्वरांनी आपल्याला दिला. तोच विचार विनोबा मांडतात. मंगेश पाडगावकरांनी लिहिलं आहे की, -

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान।
ज्ञान बनो कर्मशील कर्मज्ञानवान।

बाबा आमटे यांनी आपल्या 'ज्वाला आणि फुले' या कवितासंग्रहात 'ज्ञान गाळील घाम येथे' अशी ओळ वापरली आहे. महाभारताने देखील 'य: क्रियावान स पंडित:' असं म्हटलं; अर्थात जो काम करतो, जो क्रियाशील आहे तोच पंडित आहे. मला असं वाटतं की, अशा प्रकारच्या क्रियाशील पांडित्याची आज आपल्याला गरज आहे.

गांधीजींच्या एक अनुयायी मीराबेन शांतिनिकेतनला भेट देतात व टागोरांना, 'साबरमती व सेवाग्राम आणि शांतिनिकेतन यांच्यातील फरक सांगा' अशी विनंती करतात. टागोर म्हणतात की, ''महात्म्याचे आश्रम श्रद्धा आणि स्वयंशक्तीचे मूर्त रूप आहेत, तर शांतिनिकेतन आनंददायक संपूर्ण अभिव्यक्तीचे रूप आहे. महात्मा तपस्वी प्रेषित आहेत, तर मी आनंदाचा कवी आहे. तपस्या आणि आनंद हे एकत्रितपणे भारतीय दर्शन आणि सांस्कृतिक वारशाचा पाया आहेत.''

प्रख्यात चिंतक लिओ टॉलस्टॉय यांनी 'संक्षिप्तता, स्पष्टता आणि साधेपणा' ही कलेची लक्षणे सांगितले आहेत. 'कलाकारांनी सामान्य माणसांच्या जीवनाशी एकरूप व्हावे. शारीरिक श्रम करून उपजीविका मिळवावी आणि कलाविष्काराची मनापासून प्रेरणा निर्माण होईल तेव्हाच कलानिर्मिती करावी' असे टॉलस्टॉय म्हणत असत. गांधीजींवर यांच्या या विचारांचा प्रभाव होता. 'कलेसाठी कला' पेक्षा 'समाजासाठी कला' असा गांधीजींचा विचार होता.

विनोबा भावे यांची प्रतिभा चौफेर होती. १० फेब्रुवारी १९१८ मध्ये विनोबांनी गांधींना पत्र लिहिले असून, एका वर्षभरामध्ये त्यांनी काय उपक्रम केले यावर प्रकाश टाकला आहे. या उपक्रमाबद्दल 'विनोबा सारस्वत' या प्राचार्य राम शेवाळकर यांनी 'साहित्य अकादमी' साठी संपादित केलेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत विस्ताराने लिहिले आहे. ६ मार्च १९१७ रोजी पुण्याला जाऊन विनोबा भावे यांनी लोकमान्य टिळकांना तीन प्रश्न विचारले ते असे : पहिला; तुम्ही संपूर्णपणे निर्भय झाला आहात काय? दुसरा; कबीराचा बीजक हा वेदांतावरील ग्रंथ तुम्ही वाचला आहे काय? व तिसरा; मोक्षप्राप्ती ज्ञानाने होईल असे आपल्यास वाटते काय? पहिल्या दोन प्रश्नांची उत्तरे लोकमान्य टिळकांनी विनोबांकडे केवळ पाहिले; त्या पाहण्यात विनोबांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळून गेली. तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरात टिळक म्हणाले, 'होय, ज्ञानाने मोक्ष मिळू शकेल, पण ज्ञानी लोक-संग्रहासाठी कर्म करील'. 'विनोबांचा निदिध्यास कोणता होता हे ह्या प्रसंगावरून लक्षात यायला हरकत नाही' असे राम शेवाळकर नमूद करतात.

हृदय-परिवर्तनातून विचार-परिवर्तन व विचार-परिवर्तनाच्या द्वारे समाज-परिवर्तनाचा संकल्प प्रत्यक्षात उतरवित विनोबा १४ वर्षे भूदान चळवळीसाठी भारतभर फिरत होते.

'शिक्षण विचार' नावाचे विनोबांचे एक नितांत सुंदर पुस्तक आहे. विनोबा म्हणतात की 'सोळा वर्षांपर्यंत स्वावलंबनाचे शिक्षण व सोळा वर्षांनंतर स्वावलंबनाने शिक्षण'. 'नई तालीम' हा विचारही यातूनच आला आहे.

विनोबांच्या मते भारतीय भाषांमध्ये 'टू टीच' (to teach) या अर्थाचा शब्द नाही. याचा अर्थ 'शिकवणे' ही सुद्धा शिकण्याचीच प्रक्रिया आहे. 'जीवन व शिक्षण यांची सध्यासारखी अनैसर्गिक फाळणी नको' असे विनोबा सांगतात. जीवनाचे शिक्षण जीवनाच्या क्षेत्रातच दिले गेले पाहिजे. भगवंताने गीता अर्जुनाला कुरुक्षेत्रात सांगितली, म्हणून ती पचली. गीतेचे 'आगाऊ क्लासेस' काढले नाहीत! शिक्षणाचा प्रवास विनोबांच्या मते 'पूर्णात पूर्ण' असा आहे. स्वतःच्या पूर्णतेची स्वतःला ओळख होणे म्हणजे ज्ञान व हे ज्ञान भारतीय शिक्षण पद्धतीत अभिप्रेत आहे असे विनोबा सांगतात.

साहित्यशक्तीबद्दलच्या विनोबांच्या कल्पना श्रुती-वाङ्मयावर पोसलेल्या आहेत. 'सत्यनिष्ठा ही साहित्य निर्मितीची अनिवार्य अट आहे. साहित्य शक्ती हा आत्मज्ञान व विज्ञान यांना सांधणारा सेतू आहे. अल्पाक्षरता व सूचकता ही साहित्यातील अहिंसा आहे' असे विनोबा मानतात. 'लेखकाचे शील त्याच्या वाङ्मयात प्रतिबिंबित होते म्हणून लेखक हा उपनिषदात सांगितल्याप्रमाणे मनस्वी, स्वयंभू व निर्भय असला पाहिजे. साहित्य कसे यावर आजपर्यंत भरपूर चर्चा झाली; साहित्य कशाचे हा विचार आता व्हायला पाहिजे' असे विनोबा म्हणतात.

विनोबा भावे हे एक फार उच्च दर्जाचे साहित्यिक होते असे मला वाटते. आतापर्यंत मराठी साहित्यामध्ये त्यांना केवळ गीताईकार व उपनिषद आणि अन्य ग्रंथांचे भाष्यकार म्हणूनच ओळखले जाते. या साहित्य संमेलनात विनोबा भावे यांच्या साहित्यावर चर्चा करणारा एखादा स्वतंत्र परिसंवाद आयोजित करायला हरकत नव्हती असे मला सुचवावेसे वाटते. विनोबांचं वाङ्मय हे उच्च दर्जाच्या साहित्यिकाला शोभेल असेच आहे. त्यासाठी वानगीदाखल विनोबा हे कवीचे गुण सांगताना काय म्हणतात ते पाहू या -

कवीने सर्व सृष्टीला आत्मिक प्रेमाचे पांघरूण घातले पाहिजे. तसेच, सृष्टीच्या वैभवाने त्याला आपला आत्मा नटविता आला पाहिजे. पौर्णिमेच्या चंद्राने त्याच्या हृदय-समुद्राला भरती आलीच पाहिजे. पण पौर्णिमेच्या

(पृष्ठ क्र. १० वर)

# साहित्य संमेलन - एक ऊर्जा स्रोत

*९६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन तीन चार पाच फेब्रुवारी २०२३ रोजी वर्धा येथे साजरे झाले. त्याचा विस्तृत आढावा ज्येष्ठ लेखिका वृंदा टिळक यांनी प्रस्तुत लेखात घेतला आहे - संपादक*

एक साहित्य संमेलन झाले की महिनाभरतरी 'साहित्य संमेलनात काय झाले? ते कसे बरोबर वा चूक होते? संमेलनाच्या आयोजनात काय चांगले वा वाईट होते?' यावर चर्चा चालू राहते. ही चर्चा निवळली की मग कोणत्या ठिकाणी पुढचे साहित्य संमेलन होणार त्यावर चर्चा होऊ लागते. ते ठरले की मग अध्यक्ष कोण असणार, त्या नावाचा अंदाज सर्वजण वर्तवू लागतात. त्यानिमित्ताने माणसांना मोहरे करून विचारधारांवर टीका केली जाते किंवा विचारधारांना मोहरे करून माणसांवर टीका केली जाते. हे सगळे आटोपते आहे की नाही तोपर्यंत पुढचे साहित्य संमेलन येते. मग पुन्हा उडतो धुरळा.. कोणते विषय? कोणाला निमंत्रणे?

असेच रहाटगाडगे गेले कित्येक वर्ष आपण पहात आहोत. हे वर्षही काही वेगळे नव्हते! याचक्रमाने सगळे होत होत अखेर फेब्रुवारी उजाडला. साहित्य संमेलनाची तयारी पूर्ण झाली आणि प्रत्यक्ष साहित्य संमेलनाला सुरुवात देखील झाली.

महात्मा गांधी, विनोबा भावे, मावशी केळकर अशा थोर नेत्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले वर्धा शहर. जवळून वाहणारी वरदा नदी. ठेंगणी एक वा दोन मजली घरे, भरपूर मोकळी जागा असे हे मध्यम आकाराचे वर्धा शहर. पहाटे व रात्री गार होणारी, तर दुपारी उन्हाचे चटके देणारी कोरडी हवा. इतकी कोरडी आणि उष्ण की वर्ध्याच्या भाषेत सांगायचं तर, 'गगरा' (कोरडी माती आणि धूळ) उडत होता.

या साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून मी उपस्थित होते. तीनही दिवस साहित्यसंमेलनात जवळपास पूर्ण वेळ उपस्थित राहून साहित्य संमेलनाचा आनंद घेता आला.

वर्ध्याच्या संमेलनाचे वर्णन करताना 'भव्य' शब्द खूपदा वापरायला लागेल. संमेलनासाठी उपयोगात आणलेली जागा भव्य, मुख्य सभामंडप भव्य, व्यासपीठ भव्य, व्यासपीठ आणि श्रोत्यांच्या आसनव्यवस्थेमधील मोकळी सोडलेली जागा देखील भव्य, भोजनकक्षही भव्यच! या भव्यतेसाठी वर्धा संमेलन नक्कीच लक्षात राहील.

आयोजक असलेल्या विदर्भ साहित्य संघाला यावर्षी शंभर वर्षे पूर्ण झाली आणि हे ९६ वे साहित्य संमेलन. दोन्हीचीही शतकी वाटचाल कौतुकास्पद आणि प्रदीर्घ इतिहास व वारसा लाभलेली. अर्थातच सर्वांच्याच या साहित्य संमेलनाकडून खूप जास्त अपेक्षा होत्या.

तसे एक आणि दोन तारखेला काही कार्यक्रम सुरू झालेले असले तरी संमेलनाचा प्रमुख कार्यक्रम सुरू झाला तो ३ फेब्रुवारीला सकाळी. साहित्यसंमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने अगदी उत्साहात झाली. स्थानिक शाळा कॉलेजमधील विद्यार्थी आणि संमेलनाला आलेले साहित्यिक ह्यांचा सहभाग होता.

पहिले उद्‌घाटनाचे सत्र आचार्य विनोबा भावे सभा मंडपात जो मुख्य सभा मंडप होता तिथे, प्राचार्य राम शेवाळकर व्यासपीठावर आयोजित केलेले होते. ते सत्र उशिरा सुरू झाले. काही अनपेक्षित कारणांनी नीतिन गडकरी त्या सत्रात उपस्थित राहू शकले नाहीत; पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर हे उपस्थित होते. माजी अध्यक्ष भारत सासणे, संमेलनाध्यक्ष न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांच्या खेरीज साहित्य महामंडळाचे पदाधिकारी, समन्वयक उपस्थित होते. तसेच विश्वनाथ प्रसाद तिवारी आणि कुमार विश्वास हे देखील उपस्थित होते. ते सत्र उशीरा सुरू झाले आणि बरेच लांबले देखील !

योग्य वेळेची वाट पाहणे थांबवा; कारण योग्य वेळ कधीच येत नाही !!

तसेही उद्घाटनाचे सत्र हे सर्वांचे स्वागत, सन्मान आणि भाषणे यामुळे मोठेच असते. यावेळी ज्यांना विशेषत्वाने बोलावले होते ते डॉक्टर विश्वनाथ प्रसाद तिवारी आणि कुमार विश्वास यांना साधारण पाच पाचच मिनिटे बोलायला वेळ मिळाला. संमेलनाचे अध्यक्ष न्यायमूर्ती चपळगावकर थोडेच बोलले. पण त्यांचे संपूर्ण भाषण नंतर दुपारच्या सत्रात झाले.

संमेलनाचे अध्यक्ष न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर आपल्या भाषणात म्हणाले की, 'एखादी घटना घडली की त्यावर विचार व्हायला पाहिजे. जसे फळ झाडावरून खाली पडते हे आपण सगळ्यांनी पाहिले होते, अनेक वर्षे पाहिले होते. पण विचार मात्र न्यूटननेच केला. त्याचप्रमाणे कुठल्याही घटनेवर ती का घडली? कशी घडली? असा विचार करायला पाहिजे.' समारोपाच्या भाषणात त्यांनी सांगितले की, 'मी काल विद्रोही साहित्य संमेलनाच्या ठिकाणी जाऊन थोडा वेळ बसून आलो.' ही देखील विचार करायला लावणारीच घटना होती. समारोपाच्या भाषणात ते म्हणाले की, 'सर्वांनी एकत्र आले पाहिजे.'

३,४,५ असे तीन दिवस मिळून अनेक विषयांवर परिसंवाद झाले. ग्रंथालय चळवळीचे यश-अपयश, वैदर्भीय बोलीभाषा, गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराज आणि महाराष्ट्राची प्रबोधन परंपरा, आम्हां लेखकांना काही बोलायचे आहे, ललितेतर साहित्याची लोकप्रियता, स्त्रीपुरुष तुलना (ताराबाई शिंदे), कृषी-जीवनातील अस्थिरता आणि मराठी लेखन, मराठीतील अर्थविषयक लेखन, वाचन पर्यायांच्या पसाऱ्यात गोंधळलेले वाचक, गांधीजी आणि विनोबा - आजच्या परिप्रेक्षातून, वंचित समाजाच्या साहित्यातील लोकशाहीचे चित्रण इत्यादी विविध विषय होते. काही विशेष कार्यक्रम सादर झाले. त्यात मृदगंध - वैदर्भीय काव्यप्रतिभेचा हा विदर्भातील काव्य-परंपरेचा आढावा घेणारा कार्यक्रम होता.

शेजारी शेजारी किंवा जवळ जवळ असणारे मंडप आणि त्यात एकाच वेळी चालू असणारी सत्रे ह्यामुळे श्रोत्यांच्या मनात कोणत्या सत्राला उपस्थित रहावे याविषयी फारच संभ्रम होता. सत्र चालू असताना मध्येच उठून दुसरीकडे जाणाऱ्यांची संख्या पण मोठी होती.

परिणाम असा होत होता की; वैचारिक भाषणे, परिसंवाद ह्यांना अगदी मोजकी संख्या; पण राजकीय पुढारी, अभिनेते असतील की मुख्य मांडव ओसंडून श्रोते! संमेलन अध्यक्षांच्या भाषणाला देखील अगदी अल्प उपस्थिती होती.

सर्वात जास्त उपस्थिती आणि रसिकांची दाद लाभणारा मंडप म्हणजे गझल कट्टा. तिथे अगदी नवनवीन कवी आणि आश्वासक गजल ऐकायला मिळाली.

कवी कट्टा, बालसाहित्य, अभिवाचन हे इतर मंडप. अभिवाचनाचा ह्या वेळी प्रथमच समावेश झाला होता. प्रकाशन कट्ट्यावर अनेक पुस्तकांचे प्रकाशन झाले.

चित्रकार विजय बोधनकर ह्यांचे स्वभाव-चित्र प्रदर्शन ह्या संमेलनात होते. प्रत्येकाच्या लेखनातील, स्वभावातील, कर्तृत्त्वाचे बारकावे टिपून काढलेली एकेक चित्र पाहणे हा खूपच विशेष अनुभव होता.

बसोली ग्रुपने आयोजित केलेली शालेय विद्यार्थ्यांची चित्र स्पर्धा व नंतर त्याचे प्रदर्शन हे देखील खूप खास होते. कवितांच्या ओळींवर, त्या कविता समजून घेऊन मुलांनी काढलेली चित्रे, - जो त्यांचा सामूहिक प्रयत्न होता ती पाहणे आनंदाचे होते.

'मराठी राज्य भाषा विकास संस्थे'ने आयोजित केलेला 'मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा' ह्यासाठीचे प्रदर्शन, 'राष्ट्रपतीना पत्र' हा उपक्रम आणि 'शांतता', 'मराठीचे कोर्ट चालू आहे' हा लघुपट उल्लेखनीय होते.

या संमेलनात अनेक स्नेही सहभागी होते. त्यामुळे मग कविता असेल, प्रकाशन असेल, गझल असेल,

अभिवाचन असेल वा परिसंवाद असेल, त्यांचे सादरीकरण असेल त्या त्या ठिकाणी, त्या त्या वेळी उपस्थित राहणे हे आनंदाचे, अभिमानाचे होते.

त्याशिवाय जेवणाच्या वेळी म्हणा किंवा येता-जाताना म्हणा, अनेक जण भेटत होते, त्यांच्याशी मोकळेपणाने बोलणे, त्यांचे विचार जाणून घेणे हे देखील होत होते. हा एक मोठा आनंदाचा भाग होता.

अनेक प्रकाशन संस्थांचे स्टॉल्स होते. तिथे गर्दी दिसली नाही तरी अगदी कोणीच नाही असेही कधी दिसले नाही. आता प्रत्यक्षात विक्री झाली की नाही, हे त्या त्या स्टॉल धारकांनाच माहिती. खाऊ गल्लीतील विविध स्टॉल्स मात्र गजबजलेले असायचे!

भोजन मंडप खरोखरच भव्य होते. त्यामुळे गर्दी झाली नाही. शिवाय जेवणासाठी अनेक स्टॉल्स उभारल्याने, इतकी संख्या असूनसुद्धा, खूप वेळ रांग लावायला लागला आहे असे कधीच झाले नाही.

इथे परत आल्यावर विविध वृत्तपत्रांतील संमेलनाचा वृत्तान्त वाचणे हे खूपच ज्ञानवर्धक ठरले!

उद्‌घाटनसत्रात गडकरी असतील असे कार्यक्रम पत्रिकेत छापलेले होते. ते वाचून एका वृत्तपत्रात गडकरी उपस्थित होते असे छापून आले! प्रत्यक्षात काही अनपेक्षित घटना घडली त्यामुळे गडकरींना येता आले नव्हते! 'जे न देखे रवी, ते देखे कवी' असे ऐकले होते; पण व्यासपीठावर नसलेले गडकरी वार्ताहराला दिसले म्हणजे किती जबरदस्त वार्तांकन शक्ती म्हणावी ही!

दुसरे लक्षात असे आले की, अनेक संदर्भ देऊन केलेली अभ्यासपूर्ण भाषणे, परिस्थितीचा सम्यक विचार करून केलेली संयत भाषणे ह्यांना वृत्तपत्रांच्या दृष्टीने काहीच महत्त्व नव्हते.

'आम्हां लेखकांना काय म्हणायचे आहे?' ह्या परिसंवादात प्रवीण दवणे ह्यांनी केलेल्या आशावादी भाषणाला माध्यमांनी जास्त जागा दिली नाही. 'गांधी आणि विनोबा आजच्या परिप्रेक्षात' ह्या परिसंवादातील प्रशांत धर्माधिकारी यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाची फारशी दखल घेतली गेली नाही.

माध्यमांना वादग्रस्त विधाने असलेले, ओरडून केलेले, वेळप्रसंगी शिव्या देखील वापरलेली अशी भाषणे.. मग त्यात परिसंवादाच्या विषयाला धरून मुद्दे असोत वा नसोत.. तीच दखलपात्र वाटतात (!) असा ह्याचा अर्थ घ्यायचा का?

मुख्य मंडप खूपच भव्य होता. पण त्यातील व्यवस्था पाहणारे मात्र तिथे फारच क्वचित उपस्थित असायचे. त्यामुळे मग भल्या मोठ्या स्क्रीनवर आदल्या दिवशीच्या कविसंमेलनाची पत्रिका दिसत राहणे, अनेक लाईट स्टेजच्या मध्यभागी रोखलेले आणि बाजूला अंधार, स्टेजवर पुरेशी आसन व्यवस्था नसणे, आधीच्या सत्रातील वक्त्यांनी पाणी पिऊन रिकाम्या बाटल्या ठेवल्या असतील त्या पुढच्या सत्रातही टीपॉयवर व मंचावर देखील पडलेल्या असणे असे प्रकार घडत होते !

'स्वच्छता गृह व्यवस्था' हा तर अतिशयच दुर्लक्षित प्रकार होता. महिला स्वच्छता गृहे अगदीच अल्प आणि दयनीय होती.

तसा विचार केला तर; साहित्याचे अनेक पैलू आहेत. कथा, कादंबरी, ललित लेख, नाट्य वाचन, प्रवास वर्णन, कविता आणि बरेच काही. त्या सर्वांना काही ना काहीतरी प्रतिनिधित्व साहित्य संमेलनात मिळावे असे वाटते.

इथे मला खुलभर दुधाची कहाणी एका वेगळ्या स्वरूपात दिसते. साहित्य संमेलन हा एक भला मोठा कुंभ (मेळा नव्हे, तर कुंभ म्हणजे घडा, रांजण!); तर त्यात सहभागी प्रत्येक जण आपापल्या साहित्यकृती त्या रांजणात समाविष्ट करतो. पण मग तो संपूर्ण कुंभ सकस, समृद्ध असावा असे वाटत असेल तर मग आपला सहभाग असलेली साहित्यकृतीदेखील तेवढीच सकस नको का? लिहिणे आणि प्रकाशित करणे, सादर करायची

संधी मिळणे..सगळेच आता सोपे झाले आहे. इतर कशाची आणि कोणाचीही कसोटी मानली नाही तरी स्वतःच आपण लिहिलेल्या कृतीच्या दर्जाविषयी सजग राहायला नको का?

साहित्य संमेलनात नवे लिहू पाहणारे, अनेक वर्ष लिहीत असलेले, लिहायची इच्छा असणारे असे अनेक जण एकमेकांना भेटतात. साहित्याच्या नव्या आविष्काराने प्रभावित होतात आणि नवीन काही लिहिण्यासाठी, नवीन विचारांसाठी ऊर्जा घेऊन जातात. ह्यासाठी अशी साहित्य संमेलने होत राहिली पाहिजेत.

कुमार विश्वास म्हणाले तसे मागे बसलेल्यांना संमेलनात स्थान मिळायचे असेल तर जिल्हा पातळीवर देखील संमेलनं झाली पाहिजेत.

साहित्य संमेलनाला महाराष्ट्र भरातून श्रोते तिकिटे काढून आले होते, दरवर्षी येत आहेत ही खूपच आश्वासक गोष्ट वाटते.

साहित्य संमेलनाचा मूळ हेतू काय आहे? साहित्य विषयक चर्चा त्यात होतात का? साहित्य निर्मितीला प्रोत्साहन मिळते का? नवीन लिहू पाहणाऱ्यांना काही मार्गदर्शन मिळते का? या सगळ्या मुद्द्यांच्या विषयी प्रत्येकाच्या मनात विचार सुरू होणे हे साहित्य संमेलनाचे फलित म्हणता येईल!

मुख्य अतिथी दिनेश प्रताप सिंग आणि कुमार विश्वास या दोघांनीही सांगितले की, इतके मोठे संमेलन त्यांनी हिंदी भाषेचेही कधी पाहिलेले नव्हते.

अशी साहित्य संमेलने हा मराठी भाषेच्या दृष्टीने अभिमानाचा विषय आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी साहित्य संमेलने होत राहावीत. या निमित्ताने विचार - विमर्श होत रहावा, साहित्य निर्मितीला प्रोत्साहन मिळावे, शुभंकर ऊर्जा मिळावी.

**- वृंदा टिळक**
ठाणे
भ्रमणध्वनी : +९१ ७५०६५७४४८९

(पृष्ठ क्र.६ वरून - **गांधीजी व विनोबाजी यांच्या विचारांचे मूळ भारतीय तत्त्वज्ञानात**)

अभावी त्याच्या हृदयाला ओहोटी लागता कामा नये. अमावस्येच्या गाढ अंधारात आकाश ढगांनी भरलेले असतानाही चंद्रदर्शनाचा आनंद त्याला लाभला पाहिजे. ज्याचा आनंद बाहेरच्या जगात गुंतला आहे तो कवी नाही. कवी आत्मनिष्ठ. कवी स्वयंभू. पामर दुनिया विषय सुखावर झुलत असते; कवी आत्मानंदात डोलत असतो. लोकांना भोजनाचा आनंद. कवीला आनंदाचे भोजन. कवी संयमाचा संयम आणि म्हणून स्वतंत्रतेची स्वतंत्रता. टेनिसनने वाहत्या झऱ्यात आत्म्याचे अमरत्व पाहिले, कारण अमरत्वाचा वाहता झरा त्याला आपल्या आत्म्यात दिसला होता. कवी विश्वसम्राट असतो, कारण तो हृदयसम्राट असतो. कवीला जागेपणी महाविष्णुच्या योगनिद्रेतील स्वप्ने कळतात आणि स्वप्नात जागत्या नारायणाची जगद्रचना पहावयास सापडते. कवीच्या हृदयात सृष्टीचे सर्व वैभव साठवलेले असते. आमच्या हृदयात भुकेचे ज्ञान भरलेले आहे आणि तोंडात भिकेची भाषा. 'मी स्वतंत्र आहे किंवा मनुष्य आहे' एवढी सुद्धा जाणीव जिथे उमटली नाही तिथे आत्मनिष्ठ काव्यप्रतिभेची अपेक्षा करता येणार नाही.

गांधीजी व विनोबाजी यांचे विचार आजच्या परिप्रेक्षात आपण समजून घेतले पाहिजेत असे मला वाटते. आयोजकांनी मला इथे बोलण्याची संधी दिली त्याबद्दल त्यांचा आभारी आहे. धन्यवाद !

विशेष आभार : या भाषणासाठी प्रस्तुत लेखकाने ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक मोडक व पुनरुत्थान विद्यापीठाच्या श्रीमती इंदुमती काटदरे यांच्याशी चर्चा केली होती. मी त्यांचा ऋणी आहे.

**- डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

# मराठी भाषा गौरव दिन

*२७ फेब्रुवारी रोजी कुसुमाग्रज यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा झाला. त्यानिमित्ताने लेख - संपादक*

मराठी भाषा गौरवदिनी काही निराशाजनक सांगण्याचा हेतु नाही. वस्तुस्थिती सांगायची आहे. गौरवदिनी केवळ आजवरच्या वैभवाचाच विचार करायचा; भविष्याचा नाही, अशी कोणाचीच अपेक्षा नसणार. म्हणून हे आज लिहिण्याचे धाडस करतोय.

इंग्रजी माध्यमामुळे मुलांची मराठीशी असलेली नाळ जवळजवळ पूर्णपणे तुटलेली आहे, हे वास्तव आहे. बरे, ही मुले किमान इंग्रजीला तरी भाषा म्हणून न्याय देत असती, तरी (एकवेळ) हरकत नसती; मात्र त्या आघाडीवरही बव्हंशी शोककळा असते. बहुतांश पालक मुलांच्या इंग्रजी माध्यमाच्या पासंगाला पुरणारे नसतात. त्यातून या मुलांची पुरेशी भावनिक वाढ होऊ शकत नाही. भारताची प्रजा 'भुंडी' म्हणून विकसित होण्याचा हा फार मोठा धोका आहे, ज्याकडे कोणालाच लक्ष द्यायचे नाही.

आपल्या पाल्याला मराठी माध्यमाच्या शाळेत घालण्याची ज्या पालकांची मनापासून इच्छा असते, तेही जवळपास तशी शाळा नसल्याने हतबल असतात. आणि इंग्रजी माध्यमात असूनही मुलांमध्ये मराठीचे 'भाषा' म्हणून ज्ञान विकसित व्हावे, याकरता प्रयत्न करणारे पालक मोजकेच असतात.

इंग्रजी माध्यमाच्या मागे लागण्यात समाजातल्या सर्व आर्थिक व सामाजिक स्तरातील पालक आहेत. मराठी माणसाला मराठीचा अभिमान नसतो असे म्हटले जाते; तरी असा अभिमान असल्याचे सांगितले जात असलेल्या अगदी मल्याळी व तेलुगु भाषिकांचीही वेगळी स्थिती नाही. या भाषा लवकरच 'बोली भाषा' म्हणून उरतील अशी स्थिती आहे. तमिळ व मराठीही फार मागे नाहीत. मराठी माध्यमातून शिक्षण घेतले की इंग्रजी या 'ज्ञानाच्या' जागतिक भाषेची खिडक्या-दारे बंदच होतात हा सोयीस्कर गैरसमज पसरवला गेला आहे. मराठी माध्यमातून शिकतानाही 'भाषा' म्हणून इंग्रजी अधिकृतपणे शिकता येते, हे शक्यता म्हणूनही आपण गृहित धरत नाही!

मुलांचे आठवीपर्यंतचे नाही, तरी किमान प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून व्हावे असे सांगून शिक्षणतज्ज्ञांचे घसे कोरडे पडले. तरीही येणार येणार म्हणून येण्यास फार विलंब झालेल्या नव्या शिक्षण धोरणातही प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून द्यावे की नाही, याचा निर्णय ऐच्छिक पातळीवर सोडला गेला आहे. आत्ताच्या परिस्थितीत फरक पडण्याची सुतराम शक्यता नाही हाच याचा अर्थ. शिक्षणाबाबतच्या भारतीय वारशाचा अभिमान असल्याचा दावा करणारे सरकार सत्तेत असताना हे घडले आहे आणि त्याविरुद्ध फारसा काय; अजिबातच विरोध होताना दिसत नाही. या नव्या शिक्षण धोरणामुळे अनेक फायदे होणार आहेत हे निश्चित; परंतु म्हणून या अतिशय ढोबळ दोषाकडे कानाडोळा करायला नको.

मागच्याच पिढीत ग्रेस किंवा जी.ए. किती जणांना आकळत होते; तर मग आता काय फरक पडणार आहे!, असे कोणी म्हणू शकेल. उत्तर त्यांच्याच प्रश्नात आहे. भुंड्या प्रजेतले कितीजण यांच्याकडे आवर्जून आकर्षित होऊ शकतील याचा विचार करावा. पु.लं.सारखे लेखक आत्ताच क्षीतिजावरचे वाटू लागले आहेत, याचे कारण काही अंशी पिढी-पिढीतल्या फरकात

आहे. मात्र त्याचे प्रमुख कारण भाषेबाबतच्या उदासिनतेत आहे. आज सोशल मीडियातही देवनागरी ऐवजी रोमनमधून मराठीचे वहन करणारे पाहता मराठीची मलय किंवा टॅगलॉग भाषा झाली नाही तरच नवल! कित्येकांना मराठीत सांगितलेले आकडे कळत नाहीत, मराठी वाचता येत नाही, असेल तर त्याचा कंटाळा असतो, लिहिणे तर दूरच. मराठीवरील इंग्रजीचे सोडा; हिंदीचेही आक्रमण समजत नाही.

वाहन उद्योगातील कोरियन व जपानी कंपन्या त्यांच्या वाहनांचे भाग येथे बनवण्याऐवजी मुक्त व्यापाराच्या करारांचा फायदा घेत सरसकटपणे त्यांच्या देशातून आयात करतात. हे देश भारतातून लोखंडाचे खनिज तर आयात करतात; मात्र त्यापासून बनवलेले पोलाद भारतातून आयात करायचे म्हटले तरी या कंपन्या ते विकत घेत नाहीत. याउलट चिनी बनावटीची वस्तू थोड्या फरकाने जरी स्वस्त असली तरी भारतीय त्यावर उड्या मारतात, हे वास्तव एका केंद्रीय मंत्र्यांनी नुकतेच दाखवून दिले होते. यात देशाभिमानाचा भाग असल्याचे त्यांनी दाखवले होते. मराठी माणसाची सांस्कृतिक मुळे केव्हाच उपटली जाऊन, आत्मसन्मान गमावल्यामुळे तो या बाबतीत बेवारशी झाला आहे हे वास्तव आहे.

एकीकडे भाषाभिमानाच्या नावाखाली प्रत्यक्षात केवळ राजकारण करणारे तमिळ-कन्नड भाषिक दिसतात; त्यातून भाषेची उन्नती होते का हा प्रश्न कोणीच विचारत नाही, मात्र यांच्यासह आपण सारेच मानसिक गुलाम आहोत आणि त्याचेच प्रतिबिंब भारतीय प्रादेशिक भाषांमधून किमान प्राथमिक शिक्षणाची सक्ती न करण्यामध्ये पडले आहे. ज्यांची मातृभाषा तमिळ आहे, त्यांच्यासाठी तरी किमान प्राथमिक शिक्षण तरी तमिळमध्ये देण्याची सक्ती तमिळनाडूमध्ये असती तरी त्यांच्या भाषाभिमानाच्या राजकारणात थोडा तरी दम आहे असे म्हणता येईल. परिस्थिती खरोखर तशी आहे का? येथे राहता, तर 'आमची' भाषा यायलाच हवी एवढाच मर्यादित हेतू त्यामागे असल्याचे दिसेल. इंग्रजी माध्यमांच्या शाळांची मागणी अधिक असल्याचे सर्वसाधारणपणे देशभरात सर्वत्र दिसते. अलीकडे मुले लहान असतानाच नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने पालकांना देशभरात रहावे लागते. तेथे मराठी माध्यमाच्या शाळेची आबाळ होत असल्याने त्यापेक्षा येथेच इंग्रजी माध्यमातून सुरुवात केलेली बरी, असे म्हणणारेही आढळतील. मात्र असे होणारे प्रत्यक्षात किती जण असतात आणि त्यांच्यासाठी सर्वांनाच भुंडे बनवायचे, हा कोणता न्याय ठरतो? बरे, अशा अल्पसंख्यकांसाठीही नियम बदलण्याची खरे तर गरज नाही. जगातील सर्वोत्तम शिक्षणपद्धत असल्याचे समजल्या जाणाऱ्या फिनलंडमध्ये किमान प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून मिळणे हा मुलाचा 'अधिकार' असल्याचे समजत त्यासाठीची तजविज केली जाते. आपल्याकडे तर हे अघटितच वाटेल. एखादे मराठी कुटुंब झारखंडमध्ये नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने गेले(च), तर तेथेही त्याला मराठीतून शिक्षण मिळण्याची सोय करता येईल अशी अंगवळणी पडलेली आंतरराज्यीय व्यवस्था निर्माण करण्याचे कष्ट मुळात कोण घेईल? तेव्हा आपण कारणे सांगण्यात पटाईत असलेले मानसिक गुलाम आहोत (कासांप) हे मनोमन मान्य करून इंग्रजीला शरण जाण्याशिवाय अन्य मार्ग नाही हे कबूल करून टाकलेले बरे !

प्रादेशिक भाषांमधून शिक्षण हा भारतीय नागरिकांचा मूलभूत अधिकार समजायला हवा. तो तसा नसल्यामुळेच ही परिस्थिती उद्भवली आहे. शिक्षणासारख्या क्षेत्रात शासनाचा हस्तक्षेप नको असे म्हटले, तरी किमान काही आवश्यक गोष्टी सरकारने आखाव्याच लागतात. किमान काही बाबींसाठी तरी चरक आवश्यकच असतो. सर्वच गोष्टी स्वेच्छेवर सोडायच्या, तर मग त्याचे हे डोळ्यांसमोर घडणारे दुष्परिणामही मान्य करायला हवेत (आणि असे 'सोशल मीडियारुदन थांबवायला हवे). एकीकडे भारतीय समाज व भारत देश तोडण्यासाठी देशांतर्गत व बाहेरच्या शक्ती कार्यरत आहेत हे आपल्याला

मान्य असते; मात्र भारतीय भाषांच्या बाबतीत भुंडी प्रजा निर्माण करून आपणच त्याला हातभार लावत असतो याची आपल्याला जाणीव नसते. ती तशी नसल्यामुळेच नवे शिक्षण धोरण ठरवणाऱ्या तज्ज्ञांकडून हे मोठे पातक घडलेले आहे. प्राथमिक शिक्षणाबाबतचे धोरण ऐच्छिक ठरवण्याबाबत त्यांच्यात काहीच चर्चा झाली नाही, की कोणती चर्चा झाल्यामुळे ते ऐच्छिक ठरवले गेले हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. ही चर्चा झाली असेलच; तर ती येथे म्हटल्याप्रमाणे कासांप मानसिकता असलेलेच त्यात वरचढ ठरले असणार.

महाराष्ट्रापुरता विचार करायचा, तर येथे अहिराणी म्हणा किंवा गोंडी बोलणारेही आहेत. त्यांच्यासाठी मराठी हीदेखील परकी भाषा असल्यामुळे तिची सक्ती का असा प्रश्न निश्चितपणे विचारला जाईल. प्रमुख प्रादेशिक भाषांचीच काळजी घेण्याचीच तुमची इच्छा नाही, तर मग व्यवस्था म्हणून त्यात असलेल्या गुंतागुंतीचा तुम्ही विचार तरी करू शकाल का, हे त्यावरचे उत्तर आहे. या सर्व गुंतागुंतींचा विचार करणारे धोरण ठरवू शकत असाल तर उत्तमच; अन्यथा प्रमुख प्रादेशिक भाषांचा विचार करण्यात काहीही गैर नाही.

मराठीला अभिजात दर्जा मिळण्या न मिळण्याने यात काडीचाही फरक पडणार नाही. मराठीचे मोठ्या अभिमानाने कौतुक करणाऱ्या ज्ञानेश्वरांना मराठी माणसाच्या मानसिक गुलामगिरीच्या रोगाची पुरेशी कल्पना नसणार. अशा परिस्थितीत मराठीचे भविष्य कोणाच्या हातात आहे हा प्रश्न विचारला तर उत्तर काय असते?

विशिष्ट पद्धतीच्या शिक्षणामुळे आजवर मानसिक गुलाम घडवले गेले हे तर आपल्याला मान्य असते. परंतु मॅकॉले व ब्रिटिश जाऊन आता पाऊण शतक लोटले आणि तरी आजही आपणच आपली मान स्वेच्छेने इंग्रजीच्या फासात अडकवत आहोत, हा मॅकॉले वा ब्रिटिशांचा दोष नक्कीच नव्हे ! शिवाय भाषामाध्यमाचे तेव्हाचे दुष्परिणाम तर आपल्याला मान्य असतात; मात्र आजच्या काळात इंग्रजीशिवाय पर्याय नसल्याचे समजणारे आपण दांभिक, की वेड्यांच्या रुग्णालयात दाखल करण्याच्या लायकीचे, या प्रश्नाकडे पाठ फिरवलेलीच बरी! अशा वेळी भाषा शाळेत नव्हे; तर रस्त्या-रस्त्यावर शिकली जाते असे म्हणणे बरे पडते; एवढेच नाही तर अलंकारीकही ठरते.

हल्ली शाळा-महाविद्यालयांमध्ये 'ट्रेडिशनल डे' किंवा सणापुरताच आपला पेहराव या मातीतला उरलेला असतो. तसा पेहराव एरवीही करणे मागासलेपणाचे समजले जाते, हे त्यामागचे अलिखीत परंतु खरे कारण असते. तद्वत आपले बेगडी मराठीपण साजरे करण्यासाठीही असा मराठी भाषा गौरव दिन बरा पडतो. इतर दिवशी आपण कोण असतो, हा प्रश्नही आपल्याला पडत नाही.

भविष्यात मराठी जेव्हा बोली भाषा म्हणून उरेल, तेव्हाचे तिचे स्वरूप 'हवा येऊ द्या' म्हणा किंवा 'हास्यजत्रा' अशा 'मराठी' कार्यक्रमांमध्ये एकमेकांच्या व्यंगावरून भाष्य करून किंवा फटाफटा मारून विनोद निर्मिती झाल्याचे समजले जाते, त्यावरून आपण आज अनुभवत आहोत असे ढोबळमानाने समजायला हरकत नाही.

मातृभाषेतून शिक्षण हा मूलभूत अधिकार असल्याचे मान्य करून शिक्षण धोरण त्याच्याशी सुसंगत असेल अशी व्यवस्था करण्याचे प्रयत्न करायला हवेत हे वेगळे सांगायला नको. ते होत नसल्यामुळे आपण आजवर व यापुढेही देशभरातल्या लहानग्यांशी कोणत्या प्रकारची हिंसा करत आलो आहोत वा करत राहणार आहोत, याची कल्पना करायची असेल तर या मुलांचे चेहरे डोळ्यांसमोर आणा.

नजिकच्या भविष्यात मराठी ही बोली भाषा म्हणून उरेल, तेव्हा मराठी वाचनाच्या, लिखाणाच्या व बोलण्याच्याही स्पर्धा आयोजित होतील. या पोस्टची (फेबु तेव्हाही असेल तर) तेव्हा आठवण होईल. तोपर्यंत मराठी भाषा दिनाच्या तांत्रिक शुभेच्छा यांत्रिकपणे देत राहू!

**– राजेश कुलकर्णी**

●●●

# आपल्या इतिहासाची मोडतोड कोणी केली?

*इतिहासाच्या विकृतीकरणाचा लेखाजोखा प्रस्तुत लेखात केला आहे - संपादक*

आपण ब्रिटिशांनी लिहिलेला इतिहास शिकलो आहोत/शिकत आहोत. आपले सध्याचे केंद्र सरकार त्यात बदल करण्याचा प्रयत्न करत आहे. पण आपल्या मनात ब्रिटिशांनी शिकवलेलाच इतिहास आहे. त्यामुळे सरकारचा प्रयत्न म्हणजे आपल्याला इतिहासाचे 'भगवेकरण' वाटते. म्हणूनच आपल्या इतिहासाची मोडतोड कोणी केली, हे कधीपासून सुरू झाले हे आपण नीट समजून घेणे आवश्यक आहे.

आपल्या परंपरेत इतिहास लिहिला जात नाही. म्हणून आपला इतिहास ज्ञात नाही असे आपल्याला सांगितले जाते. पण हे अर्धसत्य आहे. आपले पूर्वज इतिहास लिहीत होते. त्यातील काही आजही पाहण्यास मिळतो. उदाहरणार्थ; कल्हाणाने सुमारे एक हजार वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये लिहिलेला राजतरंगिणी आजही उपलब्ध आहे. भारतात अनेक विश्वविद्यालयं होती. त्यातील ग्रंथालयांमध्ये हा इतिहास उपलब्ध होता. परंतु सुमारे एक हजार वर्षांपूर्वी या सर्व विश्वविद्यालयांमधील पुस्तके जाळण्यात आली. केवळ नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय काही महिने जळत होते! त्यानंतर आपल्या पूर्वजांनी आपल्या इतिहासाचे स्मरण अनेक पद्यांतून ठेवले आणि मौखिक परंपरेने हा इतिहास जिवंत ठेवला. परंतु जेव्हा येथे युरोपियन्स आले त्यांनी आपल्याला सांगण्यास सुरुवात केली की, हा मौखिक परंपरेने आलेला इतिहास म्हणजे भाकडकथा आहेत. आणि मग त्यांनी त्यांच्या सोयीनुसार आपला इतिहास लिहिणे चालू केले. आपण हाच इतिहास शिकलो.

जेव्हा युरोपियन्स भारतात आले तेव्हा त्यांचा प्रगत संस्कृतीशी प्रथमच परिचय झाला. अशी प्रगत संस्कृती पाहून ते आश्चर्यचकित झाले. त्यांनी आपल्या कुटुंब व्यवस्थेची खूपच स्तुती केली होती. खरेतर या वेळपर्यंत तुर्की आक्रमकांनी आपल्या संस्कृतीवर प्रहार केलेले होते. संस्कृतीची नासधूस झालेली होती. नंतरच्या काळात येथे ख्रिश्चन मिशनरी आले. त्यांनी येथील संस्कृतीवर प्रहार करायला सुरुवात केली. या मिशनऱ्यांच्या प्रवेशामुळे भारतात आपल्या व्यापारावर परिणाम होतो अशी ईस्ट इंडिया कंपनीची धारणा झाली होती. त्यामुळे त्यांनी सुरुवातीच्या काळात मिशनऱ्यांच्या प्रवेशाला हरकत घेतली होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना भारतीय संस्कृती आवडत होती. परंतु मिशनऱ्यांच्या लॉबीने पार्लमेंटच्या सभासदांना आपल्या बाजूला वळविले. इ.स. १८१३ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने ईस्ट इंडिया कंपनीवर त्यांचा चार्टर अमेंड करण्याची सक्ती केली. त्यात धर्मप्रसार आणला गेला आणि येथे मिशनऱ्यांचा प्रवेश सुकर झाला. या मिशनऱ्यांनी भारतीय संस्कृतीला जंगली ठरविले.

Ref https://www.youtube.com/watch?v=KuLhQb6ReBg

**भाग - २**

मागील भागात आपण सुरुवातीच्या काळात ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी भारतीय संस्कृतीमुळे कसे भारावून गेले होते ते पाहिले. पण ब्रिटिश पार्लमेंटने कायदा करून ईस्ट इंडिया कंपनीच्या चार्टरमध्ये धर्मप्रसार आणला आणि येथे ख्रिश्चन धर्मप्रसारकांना मोकळे रान मिळाले. या धर्मप्रसारकांना हिंदू धर्म आणि भारतीय संस्कृती रानटी वाटत होती.

जेम्स मिल हा स्कॉटिश माणूस चर्चचा मिनिस्टर होता. त्याला पाद्री बनायचे होते. परंतु त्याला काही कारणाने पाद्री होता आले नाही. मग तो लंडनला

आला. त्याला ईस्ट इंडिया कंपनीमध्ये काम मिळाले. त्याने भारताचा इतिहास लिहिण्यास घेतला. जेम्सला कोणतीही भारतीय भाषा अवगत नव्हती. तो कधीही भारतात आला नव्हता. तरीही त्याने भारताचा इतिहास लिहिण्यास घेतला. त्याने भारताच्या इतिहासाचे तीन खंड लिहिले. त्याचे नाव आहे James Mills History of India. ते १८०५ साली प्रकाशित झाले. त्याच्या मते त्याने कधीही भारताला भेट न दिल्याने त्याने लिहिलेला इतिहास वस्तुनिष्ठ आहे. जेम्स मिल स्वत: स्कॉटलंड मधून, म्हणजेच ब्रिटिश वसाहतीतून आलेला होता. ब्रिटिशांचा सच्चा सेवक मनात होता आणि भारताची संस्कृती बदलण्याच्या मिशनरी प्रयोगास त्याची मान्यता होती. त्याला हिंदूंबद्दल खूप आकस होता. त्याच्या मते हिंदू हे केवळ गुलाम बनण्याच्याच लायकीचे होते. त्याच्या मते ब्रिटिश भारतीय लोकांना सुसंस्कृत बनविण्याच्या मोहिमेवर भारतात आले आहेत. म्हणूनच या त्याने लिहिलेल्या भारताचा इतिहासाची मध्यवर्ती कल्पना हीच आहे. ईस्ट इंडिया कंपनीने यांच्या भारतात येणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला भारतात येण्यापूर्वी या जेम्स मिल याने लिहिलेल्या इतिहासाचा अभ्यास करणे अनिवार्य केले होते. त्यामुळे त्यानंतर भारतात येणार प्रत्येक इंग्रज अधिकारी हा हिंदूंबद्दल आणि भारतीयांबद्दल तुच्छता मनात ठेऊनच भारतात पाऊल टाकीत असे. यामुळे या नंतरच्या काळात येथे ब्रिटिशांची दंडेली चालू झाली. येथे भारतीयांना आणि विशेषत: हिंदूंना अपमानास्पद वागविणे आणि धर्मांतर करणे हीच आपली जबाबदारी आहे असे त्यांना वाटू लागले.

त्यानंतर मॅक्स मुल्लरने भारतीय इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला. त्यानेही आधी जेम्स मिल याच्या पुस्तकाचा अभ्यास केला होता. त्याला भारतीय संस्कृतीतील चांगुलपणा दिसत होता. पण त्याच्या मते येथील मूळच्या 'जंगली' भारतीयांमध्ये अशी संस्कृती उपजणे शक्य नव्हते. मग त्याने उच्च वर्णीय 'आर्य' युरोपातून भारतात आले असल्याचे प्रतिपादन केले. सुमारे ख्रिस्तपूर्व १५०० साली हे 'आर्य' भारतात आले असल्याचे त्याने सांगितले. या आर्य आक्रमण थिअरीचे दोन प्रमुख भाग आहेत. पहिला म्हणजे 'हिंदू' धर्म भारतात युरोपमधून आला आणि तो येथील मूळ रहिवाशांवर लादला गेला. दुसरा भाग म्हणजे 'संस्कृत' ही मूळची भारतीय भाषा नाही. ती युरोपमधून येथे आली.

बिशप रॉबर्ट कॉलवेल हा दक्षिण भारतात लोकांना ख्रिश्चन बनविण्यासाठी प्रयत्न करत होता. परंतु त्याला अपयश येत होते. या माणसाने मग भारताच्या इतिहासाला अधिक विकृत बनवून आपले कार्य साध्य करण्याचा प्रयत्न केला. या माणसाने 'द्राविडी' वादाला जन्म दिला. दक्षिणेतील ब्राह्मणेतर लोक हे द्राविड असून त्यांना 'आर्य' ब्राह्मणांनी गुलाम बनविले असल्याचा विचार त्याने मांडला. खरे तर हा रॉबर्ट युरोपातून आलेले 'आर्य ब्राह्मण' अधिक सुसंस्कृत असल्याचे मानत होता. परंतु आपला धर्मांतरणाचा हेतू करण्यासाठी त्याने तथाकथित द्राविडी लोकांना भडकविण्यास सुरुवात केली. त्याने अनेक पुस्तके तमिळ भाषेतून लिहिली. आजही भारतीय क्रमिक अभ्यासात ही आर्य-द्राविड कल्पना 'इतिहास' म्हणून सांगितली जाते. वस्तुत: या कल्पनेला काहीही आधार नाही. ही खोटी कल्पना पसरवून भारतीय समाजात फूट पडणाऱ्या रॉबर्ट कॉलवेलचा भव्य पुतळा आजही चेन्नईच्या मरिनाबीचवर आहे. त्याला राजकीय पक्षांकडून वेळोवेळी हारही घातले जातात!

पुढील भागात अर्वाचीन काळात पाश्चात्त्य विचारवंत आणि स्वातंत्र्यानंतरच्या आपल्या राजकारण्यांनी काय केले त्या संदर्भात थोडेसे.

Ref https://www.youtube.com/watch?v= KuLhQb 6ReBg

भाग - १ https://www.facebook.com/photo? fbid= 10226609479017402

**- संतोष कारखानीस**

सदस्य

विपीएम सिनियर कोन्सिल ऑफ सायंटिस्टस्, ठाणे

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**दि. १६ जानेवारी २०२३ – मकर संक्रांत**

देशभर विविध राज्यांतून वेगवेगळ्या नावाने ओळखला जाणारा व साजरा होणारा मकर संक्रांतीचा सण. १६ तारखेला सर्व मुलांनी काळे कपडे परिधान केले होते. या सणाबद्दलची माहिती शिक्षकांनी सांगितली. यानिमित्ताने पुढील उपक्रम घेतले.

- नर्सरी व ज्यूनियर के.जी. - भेंडीच्या सहाय्याने पतंगाच्या चित्रावर ठसेकाम करणे.
- सिनीयर के.जी. - चित्रकला वहीत रंगीबेरंगी पतंग काढणे.

'तिळगुळ घ्या, गोड बोला' म्हणून शिक्षकांनी मुलांना तिळगुळ दिला.

**२५ जानेवारी – प्रजासत्ताक दिवस**

२६ जानेवारीला देशभरात उत्साहाने साजरा होणारा प्रजासत्ताक दिवस २५ जानेवारीला शाळेत साजरा झाला. झेंड्याच्या रंगाचे कपडे मुलांनी परिधान केले होते. या दिवशी देशभक्तीवर गाणी गायली. मुलांना झेंडा, त्याचा सन्मान, सैनिकांचे योगदान व महत्त्व, हा दिवस का साजरा करतात या सर्वांची माहिती दिली गेली.

**झेंड्याचे रंग वापरून**

- ज्यूनियर के.जी. - हाताच्या पंजाचे ठसेकाम करणे.
- सिनीयर के.जी. – फुलपाखरू व फूल यांचे चित्र रंगवणे.

**शाळेत मुक्काम (Night Stay) –**

सिनीयर के.जी. च्या मुलांसाठी हा उपक्रम घेतला जातो. शनिवारी संध्याकाळी शाळेत येऊन रविवारी सकाळी मुले घरी परत जातात. यावर्षी शनिवार दि. ४ फेब्रुवारीला संध्याकाळी ७ वाजता मुले शाळेत आली. नंतर नाच, गाणी, खेळ घेत मुलांनी आनंद लुटला. सर्वांनी एकत्र बसून घरून आणलेला डबा त्यांनी खाल्ला. यानंतर शेकोटीच्या भोवती फेर धरून गाणी गायली. रात्रीच्या आकाश दर्शनाचा आनंद घेतला. आपापल्या वर्गात जाऊन रात्रीचे कपडे व अंथरुणे मुलांनी शिक्षकांच्या मदतीने घातली. सकाळी उठून ब्रश करून तयार होऊन घरी जायला निघाली. रविवारी सकाळी ७ वाजता पालकांसह घरी जाताना मुलांना 'अमूल कूल' दुधाची बॉटल देण्यात आली.

**वार्षिक विज्ञान व कला प्रदर्शन –**

**२० फेब्रुवारी २०२३ –**

दरवर्षी या प्रदर्शनाचे आयोजन केले जात. नर्सरी ते इ. ९वी पर्यंतचे अनेक विद्यार्थी यात सहभागी होतात. मुलांनी केलेले अनेक शोभेच्या गोष्टी, चित्रकलेचे नमुने, तसेच विज्ञानातील उपक्रम मांडले जातात.

- नर्सरी – फुले व पक्षी, चिमट्याच्या सहाय्याने वस्तू उचलणे, एका भांड्यातुन दुसऱ्या भांड्यात वस्तू ओतणे असे उपक्रम मुलांनी सर्वांना प्रात्यक्षिक करून दाखवले.
- ज्यूनियर के.जी. व सिनीयर के.जी. च्या विद्यार्थ्यांनी भाषा, गणित, तसेच परिसर अभ्यासातील उपक्रम मांडून सर्वांना ते स्पष्ट करून सांगितले.

**२४ फेब्रुवारी २०२३ –**

मुलांना शाळेच्या तासिकांमधे १ तासिका रोजच्या जीवनातील कृतींचे अनुभव म्हणजे कपड्यांच्या घड्या

घालणे, स्वच्छता करणे इत्यादी, यासाठी दिला जातो. २४ तारखेला मुलांनी भिजवलेली कणिक व लाटणे याच्या सहाय्याने पोळ्या करण्याच्या कृतीचा आनंद अनुभवला.

**२७ फेब्रुवारी २०२३ – मराठी भाषा दिवस**

महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी, याच भाषेचा सन्मान म्हणून २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. कवी कुसुमाग्रज यांची माहिती देऊन या दिवसाचे व मराठी भाषेचे महत्त्व शिक्षकांनी सांगितले. या संबंधीचे गीत, तसेच राज्य गीत (जय जय महाराष्ट्र माझा) मुलांना ऐकवण्यात आले. शिक्षकांनी मराठी भाषेतील एक बडबड गीत मुलांना शिकवले.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**चाणक्यनीती : वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान**

'चाणक्याचे नेतृत्व गुण तरुणांनी आत्मसात करावे': राधाकृष्ण पिल्लई. 'यशस्वी जीवनासाठी चाणक्याचे नेतृत्व गुण' या विषयावर व्याख्यान संपन्न.

'राजा हा तत्त्वज्ञ असला पाहिजे हा सिद्धांत चाणक्याने आपल्या अर्थशास्त्र ग्रंथामध्ये मांडला असून तरुण पिढीने चाणक्याचे वाङ्मय आत्मसात केले पाहिजे' असे मत ज्येष्ठ लेखक, अभ्यासक व 'कॉर्पोरेट चाणक्य' या पुस्तकाचे लेखक राधाकृष्ण पिलाई यांनी मांडले. विद्या प्रसारक मंडळ संचलित जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयामध्ये आयोजित स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेचे ३५ वे पुष्प त्यांनी दिनांक १५ फेब्रुवारी रोजी गुंफले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी भारतीय परंपरेतील नेतृत्व गुणांच्या विकासाबद्दल विस्ताराने मत मांडले.

आपल्या व्याख्यानाच्या सुरुवातीला डॉ. राधाकृष्ण पिल्लई यांनी 'नेता' या शब्दाची उकल केली. 'विनायक, गणपती, पती, राजर्षी, राजा इत्यादी शब्दांनी आपण नेत्याला संबोधतो' असे ते म्हणाले. 'कामगार, व्यवस्थापक व नेता' या तीन भिन्न संकल्पना असून व्यवस्थापक एखादा उद्योग किंवा व्यवसाय सांभाळतो मात्र उद्योगाला कुठल्या दिशेने न्यायचं हे नेता ठरवतो' असे ते म्हणाले. 'आपल्या भारतीय परंपरेत नेतृत्वगुणांना विशेष महत्त्व असून मेकॉलेच्या शिक्षापद्धतीमुळे आपण गुलामगिरीच्या मानसिकतेत जगत आहोत. या मानसिकतेतून बाहेर काढण्यासाठी चाणक्यानी सांगितलेल्या नेतृत्वगुणांचा विकास आपण केला पाहिजे' असे ते म्हणाले.

राधाकृष्ण पिल्लई म्हणाले की, 'एखाद्या गोष्टीचा संगोपांग अभ्यास करण्यासाठी विचार करण्याची पद्धत विकसित केली पाहिजे. तिला चाणक्यांनी 'आण्विक्षीकी' म्हटले. छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन समर्थ रामदासांनी 'श्रीमंत योगी' असे केले आहे. नेता हा तत्त्वज्ञ व योगी असला पाहिजे याचा हा पुरावा आहे.' अभिमन्यू व प्रल्हादाचे उदाहरण देऊन त्यांनी नेतृत्वगुणांचा विकास लहानपणापासून कसा करता येऊ शकतो यावर भाष्य केले. 'आपल्यापेक्षा मोठ्यांशी आपण प्रत्येक निर्णय घेताना सल्लामसलत केली पाहिजे' असे ते म्हणाले. आपल्या आजी–आजोबांबरोबर रोज अर्धा तास आपण वेळ दिला पाहिजे असे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. चाणक्यांनी याला 'वृद्धसंयोग' अशी संज्ञा दिली आहे.



'आपल्या मित्रांसोबत स्पर्धा करण्यापेक्षा सहकार्याची भावना आपण वाढवली पाहिजे व त्यातून नवनवे उद्योग उभे केले पाहिजेत' असे ते म्हणाले. 'चाणक्यांनी या संज्ञेला 'मित्रसंबंध' असे म्हटले आहे. आजच्या

धकाधकीच्या माहिती युगामध्ये मोबाईल व समाज माध्यमांमुळे आपलं वैयक्तिक जीवन व नातेसंबंधांमध्ये ताणतणाव असून यातून मुक्त होण्यासाठी चाणक्याचे विचार आपल्याला उपयुक्त ठरू शकतात' असे ते म्हणाले. 'भारत हा त्याच्या कुटुंब व्यवस्थेमुळे आजपर्यंत टिकून राहिला आहे; त्यामुळे तरुणांनी आपल्या कुटुंबाला व परिणाम स्वरूप देशाला देखील ऊर्जस्वल भविष्याकडे नेण्यासाठी अग्रेसर राहिले पाहिजे' असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तराचा तास रंगला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य व डॉ.वा.ना. बेडेकर व्याख्यानमाला समितीचे समन्वयक डॉ महेश पाटील, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, ग्रंथपाल नारायण बारसे व अन्य प्राध्यापक, विद्यार्थी व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ प्रशांत धर्माधिकारी यांनी केले.

**डॉ. वा. ना. बेडेकर आंतरमहाविद्यालयीन राज्य स्तरीय वादविवाद स्पर्धा २०२३**

विद्या प्रसारक मंडळाचे के.ग. जोशी कला व ना.गो. बेडेकर वाणिज्य (स्वायत्त), ठाणे महाविद्यालयातील, जनसंवाद व पत्रकारिता विभागातर्फे 'डॉ. वा. ना. बेडेकर आंतरमहाविद्यालयीन राज्य स्तरीय वादविवाद स्पर्धा २०२३', सोमवार, दिनांक २० फेब्रुवारी २०२३, रोजी सकाळी १० वाजता कात्यायन सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या वादविवाद स्पर्धेचे हे नववे वर्ष असून या वर्षीचा स्पर्धेचा विषय 'ओटीटी प्लॅटफॉर्म्सना सेन्सॉरशिप असणे आवश्यक आहे की नाही?' हा होता. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून दरवर्षी या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले जात असून यंदा या स्पर्धेचे नववे वर्ष होते.

सदर स्पर्धेस परीक्षक म्हणून लेखक व समीक्षक प्रा. संतोष पाठारे, तसेच स्प्रेडिंग नॉलेज संस्थेचे संस्थापक प्रा. पौरस देशपांडे उपस्थित होते.

सदर स्पर्धेस विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या की, 'तरुण पिढीचा स्क्रीन टाईम वाढला आहे, त्यामुळे आपण काय पाहत आहोत याचे भान जसे त्यांना असणे आवश्यक आहे. तसेच कलाकारांना देखील कलाकृती निर्माण करताना सद्सद्विवेक बुद्धीचा विचार करायला हवा.'



जळगाव, पुणे, मुंबई, ठाणे अशा विविध भागांतून एकूण १४ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. डॉ.वा.ना. बेडेकर आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रुपये ५००० रोख व सन्मानचिन्ह आदित्य मोरे, संकेत शिरोडकर (बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी), द्वितीय पारितोषिक रुपये ३००० रोख व सन्मानचिन्ह अक्षता कोडगे, विवेक वारभुवन (विवेकानंद एज्युकेशन सोसायटी विधी महाविद्यालय, चेंबूर), तृतीय पारितोषिक रुपये २००० रोख व सन्मानचिन्ह मुक्ता बोरुले, दिव्या माजवेकर (सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे) यांना मिळाले असून उत्कृष्ट वक्ता पारितोषिक विवेक वारभुवन याने पटकावले.

सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ. महेश पाटील, प्रा. डॉ. विमुक्ता राजे व प्रा. मानसी जंगम यांनी सदर स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेसाठी उपप्राचार्य सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांचे सहकार्य लाभले. जनसंवाद व पत्रकारिता विभागाच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सदर स्पर्धा यशस्वी झाली. कार्यक्रमाचे निवेदन महाविद्यालयाचा विद्यार्थी अभिषेक नेमाणे याने केले.

एकावेळी एकच काम आणि तेही एकाग्रतेने करा.

प्रा. मानसी जंगम, शिक्षक प्रतिनिधी, डॉ. महेश पाटील, उपप्राचार्य व समन्वयक, डॉ. सुचित्रा नाईक प्राचार्या यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला.

**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला**
**पद्मश्री पद्मजा फेणानी**

हा कार्यक्रम शनिवार दिनांक २५ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या पाणिनी सभागृहात पार पडला. सदर व्याख्यानमालेचे हे छत्तीसावे पुष्प सुप्रसिद्ध गायिका व संगीतकार स्वरचंद्रिका पद्मश्री पद्मजा फेणानी– जोगळेकर यांच्या मार्फत गुंफले गेले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, सौ. सुमेधा बेडेकर, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील हे उपस्थित होते. प्रा. मानसी जंगम यांनी स्वरचंद्रिका पद्मश्री पद्मजा फेणानी–जोगळेकर यांची मुलाखत घेतली.

डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेची समृद्ध परंपरा आणि त्यातून होणारे विचारमंथन याविषयी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी वक्तव्य केले. त्यानंतर सौ. सुमेधा बेडेकर यांनी डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या विषयीच्या आठवणींना उजाळा देत आपले मनोगत व्यक्त केले. जनसंवाद व पत्रकारिता विभागातील विद्यार्थीनी गार्गी गोरेगावकर हिने कार्यक्रमाच्या अतिथी पद्मजा फेणानी–जोगळेकर यांची ओळख करून दिली.



पद्मजा ताईंनी आपल्या आयुष्यातील अनेक विलक्षण आठवणींना या संवादातून उजाळा दिला. सदर कार्यक्रमत संवाद साधत असताना त्यांनी ''संगीत हेच माझं अध्यात्म आणि संगीत हिच माझी प्रेरणा'' असे वक्तव्य केले. संवादा बरोबरच बालपणी गायलेल्या ''केव्हातरी पहाटे, रूणु झुणु रे भ्रमरा, केव्हा तरी येतो वारा'' या गीतांतील ओळी गाऊन त्यांनी ही मैफिल अधिक सुरेख केली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्य व डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख डॉ. महेश पाटील व प्रा. मानसी जंगम व जनसंवाद व पत्रकारिता विभागाच्या स्वयंसेवकांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. मानसी जंगम यांनी सदर कार्यक्रमाचे निवेदन केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**'तुज आहे तुजपाशी' नाटक सादरीकरण**

मराठी राजभाषा गौरव दिना निमित्ताने मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ रोजी जोशी–बेडेकर महाविद्यालयात BAMMC विभागातर्फे पु. ल. देशपांडे–लिखित 'तुज आहे तुजपाशी' या नाटकातल्या एका महत्त्वाच्या भागाचे सादरीकरण करण्यात आले. हा कार्यक्रम जनसंज्ञापन आणि पत्रकारितेच्या प्रथम वर्षाच्या साहित्य विषयाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केला होता.




या कार्यक्रमाला अभिनेत्री किशोरी आंबिये या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या, या वेळी त्यांनी पु.ल. देशपांडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य व समन्वयक डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल नारायण बारसे व डॉ. प्रशांत धर्माधिकारी हे

मान्यवर उपस्थित होते. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या नाटकातला ४० मिनिटांचा एक भाग सादर केला. हे नाटक स्वातंत्र्यानंतरच्या काळातलं नाटक आहे. यात युवकांच्या मनातील गोंधळ दाखवण्यात आलं आहे. या नाटकात एकीकडे काकाजी जे मनमोकळे जगतात, आणि जगण्यातील आनंद पुरेपूर लुटतात, तर दुसरीकडे आचार्य जे जीवनात शिस्तबद्धता व ब्रह्मचर्य पाळतात. या सगळ्यात श्याम नावाच्या युवकाच्या मनातील गोंधळ दाखवत, कोणता पर्याय निवडावा ह्याचा विचार युवकांच्या मनात निर्माण केला आहे. या सादरीकरणात सोहम आंबिये याने श्याम देवास्कर, हर्षाली गद्रे हिने उषा देवास्कर तसेच अथर्व कदम याने आचार्य अशी महत्त्वाची पात्रं साकारली. हे नाटक मुळात विनोदी असून, या नाटकात अतिविशाल महिला मंडळ हा भाग मैथिली देसाई, सिद्धी शिर्के आणि अस्मिता तळवलकर यांनी सादर केला. हे नाटक श्रेयस व्यास व उदित कुलकर्णी यांनी दिग्दर्शित केले होते.

**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला पुष्प ३७वे "संवाद, अनुवाद"**

डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला कार्यक्रम गुरुवारी दिनांक ०२ मार्च २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात पार पडली. सदर व्याख्यानमालेचे हे सदतिसावे पुष्प प्रसिद्ध अनुवादक उमा विरुपाक्ष कुलकर्णी यांच्या **संवाद अनुवाद** मार्फत गुंफले गेले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्या प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील हे उपस्थित होते. उपप्राचार्या प्रियंवदा टोकेकर यांनी उमा कुलकर्णी यांची मुलाखत घेतली.

डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेची समृद्ध परंपरा आणि त्यातून होणारे विचारमंथन याविषयी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी वक्तव्य केले. प्राचार्या विमुक्ता राजे यांनी उमा ताईंची ओळख करून दिली.



लिखित साहित्याचा अनुवाद हा अगदी पुरातन काळापासून चालत आला आहे. आपल्याकडील बरेचसे साहित्य हे अनेक थोर मंडळींनी अनुवादाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले आहे. अशाच यू आर. अनंतमूर्ती, एस. एल. भैरप्पा, वैदेही, के. पी. पुर्णचंद्र तेजस्वी व इतर अनेक सर्वोत्तम कानडी लेखकांचे साहित्य आपल्या मराठी भाषेत अनुवाद करणाऱ्या उमा ताईंनी स्वतःला असलेली वाचनाची आवड, साहित्यातील रस, आपल्यावर असलेला साहित्याचा प्रभाव आणि आपण वाचलेले विलक्षण साहित्य अनेकांपर्यंत कसे पोहोचवता येईल यासाठी केलेला प्रयत्न याविषयी सदर मुलाखतीत सांगितले. आपल्या साहित्य प्रेमामागे कारणीभूत असलेल्या आणि कायम पाठिंबा देणाऱ्या पती देवांचा उल्लेख करत त्यांचे मार्गदर्शन त्यांना नेहमीच फायद्याचे ठरले असे देखील त्यांनी मुलाखतीत सांगितले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, तसेच उपप्राचार्य व डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख डॉ. महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व जनसंवाद व पत्रकारिता विभागाच्या स्वयंसेवकांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले. प्राध्यापिका विमुक्ता राजे यांनी सदर कार्यक्रमाचे निवेदन केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाच्या गणित आणि संख्याशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १३ आणि १४ जानेवारी २०२३ रोजी National Conference on Applied Mathematics and

Statistics (NCAMS) या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

गणित आणि संख्याशास्त्र विषयातील अतिशय नामांकित अशा वक्त्यांना या परिषदेत आमंत्रित करण्यात आले होते. संशोधन अभ्यासकांचे शोध निबंध तसेच पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन याप्रसंगी करण्यात आले होते. विविध विद्यापीठांतून १८३ विद्यार्थी आणि शिक्षक, तसेच संशोधक अभ्यासक यांनी या परिषदेत सहभाग दर्शवला होता.

संपूर्ण भारतातून मागवण्यात आलेल्या शोध निबंधाचे पुस्तक रुपी ई – प्रकाशन प्रसिद्ध निमंत्रित वक्ते माननीय बासुदेव बॅनर्जी यांच्या हस्ते करण्यात आले. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या गणित विभाग प्रमुख आणि परिषदेच्या आयोजन सचिव मीनल वानखेडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोझेस कोलेट यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. संख्याशास्त्र विभाग प्रमुख आणि परिषद आयोजन सचिव सुमैया शेख यांनी सर्वांचे आभार मानले.

डॉ. आशा जिंदाल, डॉ. सुधाकर आगरकर, डॉ. अन्नपूर्णा शंकरनारायणन, डॉ. नित्या नारायणा, डॉ. छाया लांडे, डॉ. अंजुम आरा, डॉ. संतोष गीते, डॉ. विजय सरोदे, डॉ. श्रीपाद गर्गे या नामवंत प्राध्यापकांनी 'गणित आणि संख्याशास्त्र विषयांचे विविध क्षेत्रातील उपयोग' यावर सखोल मार्गदर्शन केले.

सलग दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेमध्ये दहा शोध निबंध, तसेच १४ पोस्टर सादरीकरण यांचा समावेश होता. पोस्टर सादरीकरण स्पर्धेला परीक्षक म्हणून लाभलेल्या डॉ. अंजुम आरा आणि डॉ शिल्पा गोंधळी यांनीही या परिषदे मध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.

परिषद यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. मोझेस कोलेट, मीनल वानखेडे, सूमैया शेख, गणित आणि संख्याशास्त्र विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, परिषद समिती सदस्य आणि तृतीय वर्ष विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.



ग्रंथालय विभाग आणि वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीय वर्ष विभागाच्या विद्यार्थ्यांकरिता वनस्पतीशास्त्र विषयातील संदर्भ ग्रंथाचा परिचय हे सत्र १५ जानेवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आले होते.

वनस्पती शास्त्रातील उपयुक्त संदर्भ ग्रंथ, विशेष संदर्भ ग्रंथ, नियतकालिके यावर ग्रंथपाल कादंबरी मांजरेकर यांनी सखोल मार्गदर्शन केले. तसेच नियतकालिकांतील संदर्भ कसे वापरावे याबद्दल चर्चा केली. MS-Word चा वापर संदर्भ सूची बनवण्याकरता कशा प्रकारे करता येईल याबद्दल प्रात्यक्षिक दिले.



**ZOOMAGICA**

प्राणीशास्त्र विभागातर्फे २५ जानेवारी, २७ जानेवारी व २८ जानेवारी २०२३ रोजी ZOOMAGICA या विषयावर रोजी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये प्रदर्शन, विविध खेळ यांचा समावेश होता.

विविध प्रकारच्या प्राणी, समुद्र जीव, फुलपाखरे इत्यादींबाबत प्रतिकृती स्वरूपात प्रदर्शन भरवण्यात आले होते. तसेच २८ जानेवारी २०२३ रोजी Patent and Patenting या विषयावर डॉ. सुदेश राठोड, विभाग

प्रमुख, प्राणीशास्त्र विभाग यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



**पालक सभा**

पालकसभेच्या माध्यमातून पालकांना महाविद्यालयात आयोजित करणाऱ्या केल्या जाणाऱ्या विविध उपक्रम, पाल्याची प्रगती व विविध योजना याबद्दल माहिति देण्यात येते. महाविद्यालय व पालक यामध्ये सुसंवाद साधता येतो. वनस्पती शास्त्र विभागातर्फे २१ जानेवारी २०२३ रोजी पालक सभा द्वितीय आणि तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरता आयोजित करण्यात आली होती. या पालक सभेला ११ विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपली उपस्थिती नोंदवली. भौतिकशास्त्र विभागातर्फे २८ जानेवारी २०२३ रोजी पालक सभा द्वितीय आणि तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरता आयोजित करण्यात आली होती. या पालक सभेला २३ विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपली उपस्थिती नोंदवली.



वनस्पती शास्त्र विभाग




भौतिकशास्त्र विभाग

**ग्रंथालय विभाग**

ग्रंथालय विभागातर्फे विविध दिन, थोर व्यक्तींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, तसेच त्यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन व पुस्तक प्रदर्शन भरवून साजरे करण्यात आले. ०३ जानेवारी २०२३ रोजी सावित्रीबाई फुले जयंती, १२ जानेवारी २०२३ रोजी जिजाऊ मांसाहेब जयंती, तसेच स्वामी विवेकानंद जयंती, २३ जानेवारी २०२३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती, तसेच बाळासाहेब ठाकरे जयंती आणि ३० जानेवारी २०२३ रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



सावित्रीबाई फुले जयंती




जिजाऊ मांसाहेब जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती




नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती व बाळासाहेब ठाकरे जयंती



महात्मा गांधी पुण्यतिथी

**बा.ना.बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाला IS/ISO 21001:2018 मानांकन प्राप्त.**

२०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे स्वायत्तता बहाल करण्यात आली. नुकतेच बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाला ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड (BIS) यांच्यातर्फे IS/ISO 21001:2018 हे मानांकन प्राप्त झाले आहे.

महाविद्यालयातील विविध कार्य प्रणालीच्या दर्जाची पातळी तपासण्याकरीता मानांकनांची आवश्यकता असते. IS / ISO 21001:2018 हे शैक्षणिक क्षेत्रात देणारे एक मानांकन आहे. महाविद्यालयातील कार्यप्रणाली ISO या मानकानुसार कार्यरत आहे याची तपासणी ISO यांच्या समितीने १४ व १५ फेब्रुवारी २०२३ रोजी महाविद्यालयाला प्रत्यक्ष भेट देऊन केली, ज्यामध्ये महाविद्यालयाच्या विविध प्रक्रिया, जसे-अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, प्रशासकीय प्रक्रिया, ग्रंथालय विभाग, परीक्षा विभाग, प्रवेश विभाग, विद्यार्थी सहाय्य विभाग इत्यादी विभागांचे या समितीने मूल्यांकन केले. महाविद्यालयाने ISO तर्फे नमूद करण्यात आलेल्या निकषांची पूर्तता केल्यामुळे महाविद्यालयाला पुढील तीन वर्षांकरिता IS / ISO २१००१:२०१८ हे मानांकन २०२३ ते २०२६ या कालावधी करता प्रदान करण्यात आले आहे.

शैक्षणिक क्षेत्रात या पद्धतीचं मानांकन मिळवणारी बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ही दुसरी संस्था आहे. या मानांकनाकरीता डॉ कल्पिता मुळे व डॉ जयश्री पवार या प्रमुख समन्वयक म्हणून भूमिका बजावत होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मोझेस कोलेट, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर सहकारी यांनी अथक परिश्रम करून हे मानांकन मिळवण्यास हातभार हातभार लावला आहे. विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण व सुविधा अधिकाधिक दर्जेदार व्हावे आणि महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने अशा प्रकारची मानांकने मोलाची भूमिका बजावतात. विद्या प्रसारक मंडळाचे प्रोत्साहन हीच हे मानांकन मिळवण्यामागची प्रेरणा आहे.



**बेस्ट सायबर शिक्षा चॅम्पियनशिप**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला **'बेस्ट सायबर शिक्षा चॅम्पियनशिप'** ही निखिल फाऊंडेशन यांच्यातर्फे प्रदान करण्यात आले.

**विद्यार्थ्यांचे यश**

आदित्य विक्रम भट या विद्यार्थ्याने मुंबई विद्यापीठ आयोजित शरीर सौष्ठव स्पर्धेत पटक ६६ किलो गटात रजत पदक आणि अरिफ खान या विद्यार्थ्याने ९३ किलो गटात कांस्यपदक पटकावले. कुमारी यशिका घावणे हिची मुंबई विद्यापीठाच्या आंतर विभागीय क्रिकेट संघामध्ये ठाणे विभागातर्फे निवड करण्यात आली.

मुंबई विद्यापीठ व बी के बिर्ला स्वायत्त महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरविभागीय सायकलिंग स्पर्धेत श्रेयस दीपक मिस्त्री याने कांस्यपदक पटकावले.

आजादी का अमृत महोत्सव यानिमित्ताने आयोजित राष्ट्रीय स्तरीय चित्रकला स्पर्धेत बारावीचा विद्यार्थी कुमार अमोल चौगुले यांनी कांस्यपदक पटकावले. निर्माण प्रतिष्ठान विलेपार्ले यांच्यातर्फे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या तीन विद्यार्थ्यांचे तीन गट असे एकूण नऊ विद्यार्थी सूक्ष्मजीवशास्त्र ओलंपियाड या राष्ट्रीय स्तरीय कार्यक्रमाकरीता निवडण्यात आले होते ही स्पर्धा औरंगाबाद येथे संपन्न झाली.

तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचा विद्यार्थी साहिल गडकर याची प्रजासत्ताक दिनाच्या कॅम्पमध्ये निवड झाली होती व त्याला पीएम रॅली मेडल सुद्धा प्रदान करण्यात आले.

**पालक सभा**

७ जानेवारी २०२३ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाची पालक सभा संपन्न झाली. संगणक शास्त्र विभागाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची पालक सभा ३१ जानेवारी २०२३ रोजी, तर माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रथम वर्ष विभागाच्या विद्यार्थ्यांची पालक सभा १ फेब्रुवारी २०२३ रोजी संपन्न झाली.

**राष्ट्रीय सेवा योजना**

राष्ट्रीय सेवा योजना गटाचा निवासी कॅम्प ३ जानेवारी ते ९ जानेवारी २०२३ रोजी संपन्न झाला.

राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या ३५ स्वयंसेवकांनी रस्ता सुरक्षा अभियान आणि अवयव दान जागरूकता यामध्ये आपला सहभाग नोंदवला. महाविद्यालयाचे शिक्षक श्री. बिपीन धुमाळे, अनिल आठवले आणि विनोद थोरात यांनी देखील आपली उपस्थिती दर्शवली. यावेळी बांदोडकर महाविद्यालयाला सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

२० फेब्रुवारी २३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या स्वयंसेवकांनी उत्साहात साजरी केली.

**अभ्यास भेट**

जैवतंत्रज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी १६ फेब्रुवारी २०२३ रोजी सीइटीपी, नवी मुंबई येथे अभ्यास-भेट दिली. पर्यावरणशास्त्र विभाग जैवविविधता आणि वन्यजीव संवर्धन व्यवस्थापन या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र नॅशनल पार्क नेचर पार्क येथे २१ फेब्रुवारी २०२३ रोजी भेट दिली.

**कार्यशाळा / महोत्सव / उपक्रम**

संयुजा वार्षिक समिती यांच्यातर्फे २६ जानेवारी २०२३ रोजी 'मेकिंग ऑफ कव्हर पेज डिझाईन' या विषयावर ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाली. डॉक्टर ऊर्मिला कुमावत-सहाय्यक प्राध्यापक वनस्पतीशास्त्र विभाग यांनी मासिकाचे कव्हर पेज कशा पद्धतीने डिझाईन करावे याबद्दल मार्गदर्शन केले.

वनस्पती शास्त्र विभागातर्फे पुस्तक परीक्षण कार्यशाळा २८ जानेवारी २०२३ रोजी संपन्न झाली. सौ. कादंबरी मांजरेकर, ग्रंथपाल यांनी पुस्तक परीक्षण कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत ११८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

६ फेब्रुवारी रोजी गणित विभागातर्फे मॅथलेट हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. गणितातील विविध गमती-जमती या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सादर केल्या. छायाचित्रण स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, हीट ऑन टाईम गेम, मिस्टर अँड मिस मॅथलेट इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ८४ विद्यार्थ्यांनी या महोत्सवात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.




१४ फेब्रुवारी २०२३ रोजी विद्या प्रसारक मंडळ संकुल स्वच्छता अभियान सुरू झाले. १४ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी २०२३ या कालावधी 'संकुल स्वच्छता आणि शून्य प्लास्टिक कचरा' ही मोहीम राबवण्यात आली.

रसायनशास्त्र विभागातर्फे ८,१२ आणि १४ फेब्रुवारी २०२३ रोजी "SYSTEMATIC ENQUIRY ON SCIENTIFIC RESEARCH" या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. डॉ रोहिणी मांढरे यांनी "Writing of Effective Research Proposal", डॉ प्रल्हाद वाघ यांनी Literature Review Process डॉ अमोल जाधव यांनी "Systematic Writing of Research Manuscript" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

रसायनशास्त्र विभागातर्फे १०, ११ आणि १५ फेब्रुवारी २०२३ रोजी Virtual training program on FTIR, UV and centrifuge आयोजित करण्यात आला होता. रसायनशास्त्राच्या निष्णात अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी तृतीय वर्ष रसायनशास्त्र विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या उपकरणांची माहिती या प्रशिक्षण सत्राच्या माध्यमातून दिली. या प्रशिक्षणसत्रात ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

१६ फेब्रुवारी २०२३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ लाईफ लाँग लर्निंग तर्फे उडान फेस्टिवल चे आयोजन बांदोडकर महाविद्यालयामध्ये यशस्वीपणे करण्यात आले होते. यामध्ये २३ महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदवला होता.

जिमखाना समितीतर्फे विविध खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश साजरे करण्याकरिता पारितोषिक वितरण सोहळा १७ फेब्रुवारी २०२३ रोजी संपन्न झाला. यावेळी आपल्या महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी कुमारी केतकी गोखले या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

२७ फेब्रुवारी २०२३ रोजी मराठी भाषा दिवसानिमित्त ग्रंथालय विभाग आणि मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सौ साधना जोशी यांनी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. ग्रंथालय विभागातर्फे मराठीतील नामवंत लेखकांचे पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आले होते.


तसेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या–वरील पुस्तकांचे प्रदर्शन देखील भरवण्यात आले होते.




२८ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्ताने ग्रंथालय विभागात थोर शास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते सर श्री सी व्ही रमण यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन भरवले होते. विज्ञानातील विविध वैज्ञानिकांची ओळख होण्याच्या दृष्टीने विविध वैज्ञानिकांवरील पुस्तकांचे प्रदर्शन ग्रंथालयात भरवण्यात आले होते.



रिसर्च स्कॉलर प्रोग्राम आणि सायन्स स्केअर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून २८ फेब्रुवारी २०२३ रोजी ऑनलाईन प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टी वाढावी, चिकित्सकता निर्माण व्हावी या उद्दिष्टाने ही प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. या प्रश्नमंजुषेत १७२ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.



## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

युनिव्हर्सिटी एलएलबी सेमी IV निकाल (K.T) २ जानेवारी २०२३ रोजी जाहीर झाला

सेम III मराठी विशेष व्याख्यान

७ ते ९

| दिनांक | विषय | शिक्षक |
|---|---|---|
| १७-२३ | प्रशासकीय कायदा | डॉ. सौ. श्रीविद्या जयकुमार, श्रीमती कृष्णा कामत, श्री. विनोद वाघ |
| १८-२४ | कंपनी कायदा | श्री. यतीन पंडित, श्री. अभिलाष स्वरांगी |
| १९-२५ | मालमत्ता हस्तांतरण कायदा आणि सुलभता कायदा | श्रीमती ए.ए. दातार |
| २०-२६ | कुटुंब कायदा | श्री अंबर जोशी |

**जानेवारी - ३ :** सावित्रीबाई फुले जयंती (जेंडर सेंसीटायझेशन)

३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले पहिल्या महिला शिक्षिका ह्यांच्या जयंती निमित्त 'सशक्त महिला असावी' ह्या विषयावर बोलण्याकरिता विद्यार्थ्यांसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. सदर कार्यक्रम हा महाविद्यालयाच्या 'मनू' सभागृहात घेण्यात आला. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

**सेम VI लेक्चर्स: ६ जानेवारी** रोजी सेम VI लेक्चर्सची सुरुवात 'कोर्सची उद्दिष्टे आणि परिणामांवर' ओरिएंटेशनसह झाली.



**६ जानेवारी रोजी साक्षीदार तपासण्याबाबत कार्यशाळा**

**५ वाजता :** मौखिक पुरावा परिचय आणि संसाधन व्यक्तीचे स्वागत. अॅड. आय. ए. शेख यांचे स्वागत डॉ. सौ. श्रीविद्या जयकुमार ह्यांच्या हस्ते करण्यात आले.

**५.३० वाजता :** स्वारस्याच्या परीक्षेचा अनुकरण व्यायाम

**प्रकरण :** खून खटला : कलम ३०२, आय.पी.सी

**साक्षीदार-: सहाय्यक** आयओ म्हणून प्रा.श्री.व्ही.एच.वाघ

**पीपी:** मि. गणेश गोशीकोंडा, III वर्ष. एलएलबी विद्यार्थी.

**बचाव पक्षाचे वकील:** अॅड.श्री.आय.ए.शेख

**न्यायाधीश :** डॉ. सौ. श्रीविद्या जयकुमार

**६.३० वाजता :** साक्षीदार तपासण्यावर अॅड.आय.ए. शेख यांच्या द्वारे चर्चा करण्यात आली.

**SEM VI**

वर्गाच्या पहिल्या दिवशी ६ जानेवारी २०२३ रोजी इंटर्नल्स आणि प्रॅक्टिकल (डीपीसी III) वरील सूचना विद्यार्थ्यांसाठी देण्यात आली.

**१० जाने :** प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी वाद विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धा संबंधित माहिती खालील प्रमाणे -

**विषय -** न्यायपालिकेत महिलांसाठी आरक्षण योग्य आहे का?

**न्यायाधीश:** श्रीमती हेतल मिशेरी, श्री. अंबर जोशी

**पारितोषिक विजेते:**

| इंग्रजी | मराठी |
|---|---|
| रितेश रोजोडकर | कुलदीप सांगळे |
| चस्मित कौर | श्रीराम गोडे |
| कृष्णा गायकवाड | जागृती शेलार |

**फ्रेशर्स वक्तृत्व स्पर्धा ९ जानेवारी**

विषय १. मी एलएलबी प्रोग्रामसाठी नोंदणी का केली आहे?

२. नवीन वर्षाचे ठराव

न्यायाधीश: सौ. कृष्णा कामत व श्री. अंबर जोशी

**पारितोषिक विजेते:**

| इंग्रजी | मराठी |
|---|---|
| विवेक पाटील | दिग्विजय गायकवाड पाटील |
| श्रीराम गुप्ते | श्रीराम गोडे |
| चतुर्थी देशमुख | जागृती शेलार |

**वकिलांसाठी लेखाविषयक कार्यशाळा १८ जानेवारी ५-७ वाजता**

१८ जानेवारी रोजी प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी ''वकिलांसाठी लेखापरीक्षण'' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. श्री सुखराम बिसेन हे चार्टर्ड अकाउंटंट, कॉस्ट अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी आणि वकील असून त्यांना रिसोर्स पर्सन म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी सदर कार्यक्रमात खालील विषय हाताळले :

३१ जानेवारी २०२३ रोजी विद्यार्थ्यांना डीपीसी (III) अभ्यासासाठी लागणाऱ्या साहित्याचे वाटप करण्यात आले.

२१ जानेवारी २५ रोजी प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांच्यासमवेत विद्यार्थ्यांनी माननीय श्री न्यायमूर्ती चंद्रचूड, सीजेआय आणि दिवाणी आणि फौजदारी हँड बुकचे प्रकाशन आणि बीजीएमजी-एआयआर न्यूजच्या लाँचिंगसाठी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा कार्यक्रमात हजेरी लावली. भारताच्या माननीय सरन्यायाधीशांचे म्हणणे ऐकण्याची ही एक दुर्मीळ संधी होती. योगी सभागृह, स्वामीनारायण मंदिर, दादर येथे हा कार्यक्रम पार पडला. त्यांनी दिलेल्या प्रेमळ निमंत्रणासाठी आम्ही बीजीएमजीचे ऋणी आहोत.

**M.C.changla chair**

२७ जानेवारी २०२३ रोजी प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांच्यासह १२ विद्यार्थी. विद्यापीठ दीक्षांत सभागृहात M.C. changla chair व्याख्यानाला उपस्थित राहिले. हे व्याख्यान माननीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश (RTD) श्री रोहिंटन नरिमन यांचे होते .

सेम I इंटर्नल्स आणि प्रॅक्टिकल

सेमिस्टर १ चे इंटर्नल आणि प्रॅक्टिकल नियोजित वेळेनुसार घेण्यात आले.

**सेम III पूर्वतयारी परीक्षा**

सेमी III पूर्वतयारी परीक्षा १७,१८,१९,२० जानेवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. प्रश्न पत्रिकेवर खालील प्रकारे चर्चा करण्यात आली -

१७ प्रशासकीय कायदा : डॉ. सौ. श्रीविद्या जयकुमार, श्रीमती कृष्णा कामत आणि श्री.विनोद वाघ

१८ कंपनी कायदा : श्री. यतिन पंडित, श्री. अभिलाष स्वरांगी

१९ मालमत्ता हस्तांतरण कायदा आणि सुलभता कायदा: श्रीमती ए.ए. दातार

२० कौटुंबिक कायदा : श्री अंबर जोशी

दोष लपवला की तो मोठा होतो आणि कबूल केला की नाहीसा होतो!

**विद्यापीठाच्या संलग्नतेबाबत**

आमच्या कॉलेजने एलएलएमसाठी विद्यापीठाच्या मान्यता प्राप्ती साठी अर्ज केला.

एलएलबी ३ वर्षांसाठी कार्यक्रम आणि अतिरिक्त विभागात संक्रांतीचा दिवस, म्हणजे १४ जानेवारी २०२३ ही अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख होती. अर्जांसाठी सरकारी अधिसूचना १० जानेवारी २०२३ रोजी लागू करण्यात आली होती.

२१ जानेवारी २०२३ रोजी आमचे कॉलेज मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात विद्यापीठाच्या सबमिटिंग समितीसमोर सादर केले. मूळची पडताळणी करण्यात आली आणि अर्जाची छाननी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांच्यासह लिपिक श्री. मुकेश राणे व शिपाई श्री. राकेश पठारे यांनी केले.

**कॉलेजचे वार्षिक खेळ**

२१ आणि २२ जानेवारी २०२३ रोजी विद्यार्थ्यांसाठी वार्षिक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. खालील खेळ आयोजित केले गेले –

| नाव खेळाचे | विजेते | विजेते |
|---|---|---|
| कॅरम (पुरुष/स्त्रिया) | 1st – हर्षल भालके (FY)<br>2nd – यदनेश भोईर (SY)<br>3rd – मंगलदास केणे (TY) | 1st – प्रांजली गोखले (TY)<br>2nd – राखी विरकर (SY)<br>3rd – अंजली शॉ (TY) |
| बुद्धिबळ (पुरुष/महिला) | 1st – तेजस पाटील(FY)<br>2nd – कौशल पाटील (FY)<br>3rd – रोहित आचरेकर (TY) | 1st – सिद्धी गवस (FY)<br>2nd – ईशा ओडेकर (FY) |
| टेबल टेनिस (पुरुष/महिला) | 1st – पिझान कोडिया (TY)<br>2nd – सिद्धार्थ पिटले (TY)<br>3rd – सागर शिंदे (SY) | 1st – सिद्धी गवस (FY)<br>2nd – अंजली शॉ (TY)<br>3rd – प्रांजली गोखले (TY) |
| बॅडमिंटन | 1st – अनिकेत घाटोळे (TY)<br>2nd – रोहन देव (FY)<br>3rd – बाळासाहेब काळे (SY) | 1st – अनुराधा दुबे (SY)<br>2nd – अंबिका सेठी (SY)<br>3rd – कीर्ती गोएंका (TY) |

क्रिकेट –

| 1st FY | 2nd FY |
|---|---|
| हर्षल भालके, गीत बनारसे, तुषार बेटकर, अनिकेत साळुंके, विपुल ठुबे, केतन थोरवे, चिराग महाडीक, वर्षा शिंदे | अक्षय राऊत, अजय राठोड, प्रतिक जगताप, अनिकेत म्हात्रे, बालाजी कांगणे, सुरज कधने, बाळासाहेब काळे, साक्षी कुमावत. |

| | |
|---|---|
| सर्वोत्तम वर्ग – | पहिले वर्ष २०२३ (FY) |
| सर्वोत्तम परफॉर्मर पुरुष – | हर्षल भालके (FY) |
| सर्वोत्कृष्ट परफॉर्मर महिला – | सिद्धी गवस (FY), प्रांजली गोखले (TY) |

डोक शांत असेल तर निर्णय चुकत नाहीत, अन् भाषा गोड असेल तर माणसं तुटत नाहीत !

**क्रीडा दिन स्वयंसेवक**

| | |
|---|---|
| प्रथम वर्ष L.LB – | कौशल पाटील, वैष्णवी वाघ, कौस्तुभ भोसले |
| द्वितीय वर्ष L.LB – | राखी विरकर, मिहीर कोळेकर, अश्विनी खरात, राजीव रंजन, विशाल चव्हाण, अपेक्षा बेलवले, प्रतिक जगताप |
| तृतीय वर्ष L.LB – | अभिनंदन सावंत, प्रांजली गोखले, हेमांशू बडगुजर, प्रियांका जाधव, अविनाश आनंद, अंजली शॉ, नेहा बहेलिया, साक्षी पितळे, भैरवी राऊत, सोनम पाटील, प्रीती भोईर, गणेश गोशीकोंडा, श्रेयस घाग, हितेश म्हाणेरे, क्षितिजा खांगटे, |



सेमिस्टर I चे अतिरिक्त व्यावहारिक प्रशिक्षण आणि इंटर्नल्स ११ फेब्रुवारी रोजी आयोजित केले गेले.

रिअल इस्टेट कायद्यांवरील प्रमाणपत्र कार्यक्रमा–साठी प्रकल्प सबमिशन, वायवा आणि लेखी परीक्षा २५ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली होती.

१ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीवर एक दिवसीय चर्चासत्र जोशी बेडेकर महाविद्यालय द्वारे आयोजित करण्यात आले होते. सदर चर्चासत्रास सहाय्यक प्राध्यापक श्री. विनोद वाघ सहाय्यक प्राध्यापक कु. हेतल मिश्री ग्रंथपाल सौ. शीतल सोनवणे आणि प्रभारी कार्यालय अधीक्षक सौ. रंजन करंदीकर उपस्थित होते.

**दिनांक ८ फेब्रुवारी**

संसाधन व्यक्ती

५. वाजता लैंगिक समानता

६. ३० आरोग्य आणि तंदुरुस्ती व्यसनाला नाही म्हणा

डॉ. स्वाती गाडगीळ यांनी व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे येथील विद्यार्थ्यांना लैंगिक समानता आणि सक्षमीकरण या विषयावर मार्गदर्शन केले. अनेक जिवंत उदाहरणांच्या सहाय्याने, त्यांनी विविध केस कायदे आणि कायदेविषयक स्पष्टीकरणाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे हक्क आणि सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली.

त्याच दिवशी झालेल्या दुसऱ्या सत्रात तरुणांमध्ये तसेच प्रौढांमधील सर्व प्रकारचे व्यसन आणि त्याचे दुष्परिणाम यावर त्यांनी अनेक प्रकरणे प्रसारित केली, ज्यात त्यांच्या आणि त्यांच्या टीमने निर्माण केलेल्या सामान्य जनजागृतीमुळे अनेक व्यसनी आता केवळ भारतातच नाही तर परदेशांतही व्यसनमुक्त आहेत.

डॉ. स्वाती यांनी लहान मुलांमध्ये त्यांच्या पालकांना किंवा कुटुंबातील इतर सदस्यांना व्यसन सोडण्यासाठी मदत करण्याच्या शक्तीचा जोरदार पुरस्कार केला. सादर कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रो.कृष्णा कामत ह्यांनी केले.

तृतीय वर्ष विधीची विद्यार्थिनी कु. कोमल जगताप हिने पाहुण्यांची ओळख करून दिली, तर तृतीय वर्ष विधीची विद्यार्थिनी क्षितिज खांगटे हिने आभार प्रदर्शन सादर केले.

विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने १६ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता LLM आणि अतिरिक्त विभागासाठी संलग्नता वाढविण्याच्या आमच्या अर्जाच्या संदर्भात कॉलेजला भेट दिली. समितीची सदस्य डॉ. सौ. राजश्री वऱ्हाडी आणि डॉ. वर्षा आठवले हे होते. आमच्या पायाभूत सुविधांवर समिती खूश होती.

सेमिस्टर IV - अभिमुखता १३-१८ फेब्रुवारी अभ्यासक्रम, ऐच्छिक, इंटर्नल्स आणि डीपीसीची ओळख. अंतर्गतसाठी प्रकल्प आणि वर्ग चाचण्या ह्यांची ओळख करून देण्यात आली. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे आणि बाहेर येण्याबाबत माहिती देण्यात आली.

१६ फेब्रुवारी - डॉ. सुयश पाटणकर यांची मध्यस्थी ह्या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.



१६ फेब्रुवारी रोजी डॉ. सुयश पाटणकर ह्यांचे मीडिएशन ह्या विषयावर महाविद्यालयाच्या मनू सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तृतीय वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ह्या व्याख्यानात ८० ते ९० विद्यार्थी सहभागी झाले होते. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार व इतर शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. विनोद वाघ ह्यांनी केले.

१७ फेब्रुवारी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात सांस्कृतिक दिन पार पडला. त्यात अनेक स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धा व त्याचे विजेत्यांची नावे खालील प्रमाणे:

**फोटोग्राफी आणि व्हिडिओ-ग्राफी स्पर्धा :-**

**फोटोग्राफी स्पर्धा विजेते :-**

प्रथम पारितोषिक - दर्शन कासारे
द्वितीय पारितोषिक - अविनाश आनंद
तृतीय पारितोषिक - रोहित आचरेकर

**व्हिडिओ ग्राफी स्पर्धा विजेते :-**

प्रथम पारितोषिक - दिग्विजय पाटील
द्वितीय पारितोषिक - जयश्री धर्माधिकारी
तृतीय पारितोषिक - प्रीत मानकर

परीक्षक, माजी विद्यार्थी आणि मराठी सिने-अभिनेता श्री. निकेत मोरे

**रांगोळी स्पर्धा :** विजेते - १) प्रियांका आचार्य (TY)
२) कोमल जगताप (TY)

**नेल आर्ट स्पर्धा :** विजेते - प्रीती कारभारी (TY)

**मेहंदी स्पर्धा :** विजेते - निवेदिता चौधरी (TY)

**खजिना शोध खेळ : विजेते**

| **प्रथम स्लॉट संघ पांढरा** | **दुसरा स्लॉट संघ पांढरा** |
|---|---|
| गीत बनारसे (FY), नेहा बहेलिया (TY), ऋषवी चौबे (SY), भाग्यश्री आचार्य (TY), रुतिका पेठकर (FY) | यश पवार (SY), नीता मुल्लाकर (SY), प्रीत मानकर (TY), अमृता बांगळे (SY), अनिकेत म्हात्रे (SY) |

**सांस्कृतिक उत्सव स्वयंसेवक विधी मंथन २०२२-२०२३**

| | |
|---|---|
| प्रथम वर्ष L.LB - | विवेक पाटील, सेजल म्हसकर, स्वधन सकपाळ, हिना खान, दिग्विजय पाटील, रुतवी पाटील, शिवानी वाळेकर, ईशा ओडेकर, नेहा गाडे, स्नेहल गुजर, कौशल पाटील, वैष्णवी वाघ, कौस्तुभ भोसले, अश्विनी जमखंडी, चतुर्थी देशमुख, शुभम सारंगुळे |
| द्वितीय वर्ष L.LB - | ओंकार अय्यर, राखी विरकर, मिहीर कोळेकर, अश्विनी खरात, राजीव रंजन, विशाल चव्हाण, अपेक्षा बेलवले, प्रतिक जगताप, सायली सावंत, रिश्वी चौबे, पूर्वा मोंडकर |
| तृतीय वर्ष L.LB - | कल्पना म्हात्रे ठाकूर, प्रियांका आचार्य, प्रवीण मित्तल, विनायक शिवगण, भाग्यश्री आचार्य, कुंदन गोसावी, आचल वाघोडे, रिद्धी देशपांडे, फैजा शेख, आनंद त्रिपाठी, प्रांजली गोखले, साहिल तांबडे, प्रीत मानकर, प्रियांका जाधव, भाग्यश्री चव्हाण, अविनाश आनंद, अंजली शॉ, नेहा बहेलिया, रोहित आचरेकर, धनश्री फुले, प्रीती भोईर, निवेदिता चौधरी, गणेश गोशीकोंडा, हितेश म्हाणेरे, क्षितिजा खांगटे, कोमल जगताप |

माजी विद्यार्थी आणि प्राचार्य श्री एन.एम.राजाध्यक्ष यांचे २७ जानेवारी २०२३ रोजी निधन झाले. आमची अश्रूपूर्ण श्रद्धांजली.

जोशी बेडेकर महाविद्यालयात डॉ. व्ही.एन. बेडेकर मेमोरियल डिबेटमध्ये आमचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी श्री. विवेक पाटील आणि कु. चतुर्वेदी यांनी सहभाग घेतला सेन्सॉर OTT प्लॅटफॉर्मसाठी या विषयावर वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी २५ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान MSME टेक्नॉलॉजी सेंटर, भोपाळ, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत भारत सरकारच्या सोसायटीद्वारे आयोजित कामगार आणि औद्योगिक कायद्यावरील २ दिवसांचा ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाची वार्षिक क्रीडा, २ ते ४ फेब्रुवारीला आयोजित केली. इनडोअर व आऊटडोअर अशा दोन्ही क्रीडा प्रकारचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमात क्रिकेट, फूटबॉल, लंगडी, लगोरी, टग ऑफ वॉर, कॅरम (सिंगल व डबल्स), टेबल टेनिस, बॅडमिंटन (सिंगल व डबल्स), बुद्धीबळ अशा विविध खेळांचे आयोजन केले.

---

जीवनात आव्हाने टाळण्याचा कोणताही पर्याय नाही,
म्हणून एकतर त्यांचा सामना करण्यास शिका किंवा हार मानू नका !

| क्र. | खेळाचा प्रकार | विजेते | उपविजेते |
|---|---|---|---|
| १ | क्रिकेट | तृतीय वर्ष (इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी) | तृतीय वर्ष (इन्स्ट्र्युमेन्टेशन) |
| २ | फूटबॉल | प्रथम वर्ष (इन्स्ट्र्युमेन्टेशन) | तृतीय वर्ष (कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) |
| ३ | कबड्डी | द्वितीय वर्ष ((इन्स्ट्र्युमेन्टेशन) | तृतीय वर्ष (इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स) |
| ४ | कॅरम (सिंगल मुले) | वुबेरे आदी अबदुल्लाह (प्रथम वर्ष इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी) | मुकुल घोडके (द्वितीय वर्ष इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम) |
| ५ | कॅरम (डबल्स मुले) | १) आयुष साळुंखे (द्वितीय वर्ष इन्स्ट्र्युमेन्टेशन)<br>२) सार्थक मैत्राणी (द्वितीय वर्ष) | १) ऋषीकेश पालकर (तृतीय वर्ष इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी)<br>२) पार्थ मोरे (तृतीय वर्ष इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी) |
| ६ | बुद्धीबळ | सोहम देसाई (तृतीय वर्ष इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी) | मनीष राजे (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) |
| ७ | कॅरम सिंगल (मुली) | परिणिता मोरे (प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) | आर्या आरयुगडे (प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) |
| ८ | कॅरम डबल्स (मुली) | १) परिणिता मोरे (प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग)<br>२) आर्या आरयुगडे (प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) | १) ईशा तलवडकर (प्रथम वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स)<br>२) हर्षिता तन्वर (प्रथम वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स) |
| ९ | टेबल टेनिस | ईसा बुबरे (प्रथम वर्ष इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम) | नील देशमुख (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) |
| १० | लंगडी | प्रथम वर्ष (इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी) | तृतीय वर्ष इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टिम) |
| ११ | लगोरी | तृतीय वर्ष (इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी) | तृतीय वर्ष इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टिम) |

वरील खेळांसाठी खालील शिक्षकांनी प्रभारी (Incharge) म्हणून काम केले.

श्री. आनंद आचार्य, श्री. शुभम वाडकर, सौ. किरण पाटील, सौ. सुप्रिया परब, श्री. संजय भोरे, श्री. अनिकेत पाष्टे, सौ. निवेदिता राणे, सौ. सुरभी श्रॉफ, सौ. योगिता कदम

**सांस्कृतिक उपक्रम :–**

**दिनांक ०२/०२/२०२३ ते ०४/०२/२०२३**

दि. ०२/०२/२०२३ रोजी सांस्कृतिक उपक्रमाची सुरुवात गायन स्पर्धेने झाली. ओंकार पाटील (तृतीय वर्ष कॉम्प्युट) व ऋतुजा पाठक (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर) यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. सदर कार्यक्रमात १५

सांभाळून चला; कारण कौतुकाच्या पुलाखाली मतलबाची नदी वाहात असते!

जणांनी सहभाग घेतला. त्यात ८ जणांनी द्वंद्व व ७ जणांनी एकल गायनात सहभाग घेतला. डॉ. सौ. गीताली रंगवले व सौ. पूजा जांभळे यांनी कार्यक्रमाचे परीक्षण केले.

**एकल गायन स्पर्धेचे विजेचे :-**

१) आदेश गव्हाणे (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर) - प्रथम पारितोषिक

२) पल्लवी वर्तक (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर) - द्वितीय पारितोषिक

३) समृद्धी हेदुलकर (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर) - तृतीय पारितोषिक

**उत्तेजनार्थ :-**

१) हर्षदा साळुंखे (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर)

२) प्रगती कांबळे (द्वितीय वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स)

**Saree Queen आणि Tie King**

सदर सांस्कृतिक कार्यक्रमात सौ. विभावरी ईखे (कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) व वर्षा पागनीस (इन्फोरमेशन व टेक्नॉलॉजी) यांनी कार्यक्रमाची सूत्र सांभाळली. नेहा जाधव व साई साणस (तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) यांनी निवेदन केले. १२६ जणांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. सदर कार्यक्रमात श्री. आनंद आचार्य, सौ. सिद्धी कोपरकर, सौ. सौम्या स्वामी व प्रज्ञा बोडके यांनी परीक्षणाचे काम केले.

Saree Queen सृष्टी जाधव (तृतीय वर्ष - कॉम्प्युटर इंजिनिअरिंग)

उपविजेती - नेहा जाधव (तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग)

Tie King आर्य मिश्रा (द्वितीय वर्ष इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी)

समीप गोडावले (तृतीय वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स)

**रांगोळी, मेहंदी व पोस्टर स्पर्धा**

Co-ordinator - सौ. स्मिता खंडागळे, सौ. राजश्री पाटील

**रांगोळी -**

१) ऋतुजा सरगार (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर) प्रथम पारितोषिक

२) मानसी भोसले (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर) द्वितीय पारितोषिक

३) मानसी सुतार (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर) तृतीय पारितोषिक

**मेहंदी -**

१) हनीन दळवी (द्वितीय वर्ष इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी) प्रथम पारितोषिक

२) वैष्णवी कोयंडे (तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) द्वितीय पारितोषिक

३) वेदिका कदम (द्वितीय वर्ष इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम) तृतीय पारितोषिक

**पोस्टर -**

सामर्थ्य सुर्वे (तृतीय वर्ष इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम)

**राष्ट्रीय विज्ञान दिवस**

२८ फेब्रुवारी १९२८ रोजी सी.व्ही. रमन यांनी पदार्थ विज्ञान क्षेत्रात रमण इफेक्टचा शोध लावला होता. त्यांच्या या विज्ञान क्षेत्रातील अमूल्य कार्यासाठी त्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित केले होते. चंद्रशेखर व्यंकट रमण यांच्या ह्याच अतुलनीय कामगिरी, तसेच वैज्ञानिक शोधाच्या स्मरणार्थ दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा केला जातो.

या वर्षी दि. २८ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिनाचे' औचित्य साधून वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनाच्या

ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात साजरा केला. सदर दिनाच्या निमित्ताने ग्रंथालयात समाविष्ट असणाऱ्या विज्ञान ग्रंथाचे भव्य प्रदर्शन सकाळी ८.०० ते ६.०० या वेळेत ग्रंथालयाच्या इमारतीमध्ये भरविण्यात आले होते. पाश्चात्त्य आणि भारतीय शास्त्रज्ञ आणि त्यांनी लावलेले शोध हे भव्य प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण होते. ए.पी.जे. अब्दुल कलाम, निकोला टेसला, लुई पाश्चर, हरगोविंद खुराना, सी.व्ही. रमण मायकल फराडे इत्यादी.





सदर प्रदर्शन भरविण्यामागचा मुख्य हेतू असा की, विज्ञानाची महती पटवून देणे आणि देशासाठी आणि संपूर्ण जगासाठी शोध लावणाऱ्या सर्व थोर शास्त्रज्ञांची आठवण येणाऱ्या पिढीला करून देणे, शिवाय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयाची गोडी निर्माण करून देणे.

सदर प्रदर्शन हे दोन दिवस ठेवण्यात आले होते. विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी प्रदर्शनाचा लाभ घेतला. तसेच प्रदर्शनाबद्दलचा आपला अभिप्राय नोंदवला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

१ फेब्रुवारी : संचालक डॉ. नीतिन जोशी तसेच ब्रिम्स च्या आयक्यूएसी समितीतर्फे डॉ. पल्लवी चंदवासकर; रामानंद आर्य डी. ए. व्ही. महाविद्यालय आणि मुंबई विद्यापीठासह जोशी बेडेकर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० च्या अंमलबजावणीवरील एक दिवसीय चर्चासत्रात उपस्थित राहिले.

४ फेब्रुवारी : प्रा. कृष्णकांत लसुणे यांच्या मार्गदर्शनाखाली, सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्चने आयोजित केलेल्या अन्वेशी २०२३ या शोधनिबंध सादरीकरण स्पर्धेत एमएमएसच्या विद्यार्थिनी जुई शिंदे आणि हेमांगी पोस्ती यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.



४ फेब्रुवारी : राष्ट्रीय परिषद २०२३ : व्यवस्थापन शिक्षण: उद्योजगतेसाठी सुविधाजनक सुलभीकरण (National Conference on : Management Education: Facilitating Entrepreneurship)

वि. प्र. म. च्या डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनजेमेंट स्टडीज, ठाणे म्हणजेच डॉ. व्ही.एन. ब्रिम्स (BRIMS) तर्फे शनिवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

उद्योजक निर्माण करण्याच्या दृष्टीने दर्जेदार शिक्षण देऊ पाहणाऱ्या संस्थेसाठी शिक्षकांचा व्यावसायिक (professional) विकास महत्त्वाचा ठरतो. व्यवस्थापन शिक्षणाच्या माध्यमाद्वारे लोकांच्या मानसिकतेला उद्योजकतेकडे कसे नेता येईल, शैक्षणिक प्रणालीला सर्वांगीण बनवण्यासाठी शैक्षणिक प्रणालीवर लक्ष केंद्रित करणे कसे आवश्यक आहे आणि शिक्षक, तज्ज्ञ, मार्गदर्शक, नेता, नवोदित, समन्वयक, उद्योजक अशा सर्वांना उद्योजकतेबद्दल चर्चा करण्यासाठी व्यासपीठ

उपलब्ध करून देता येईल, ही चर्चा विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे जाण्यास मदत करतील जेणे करून त्यांची उद्योजक – मानसिकता वाढेल. या उद्देशाने ब्रिम्स तर्फे या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

माननीय अतिथी सदस्यांच्या हस्ते झालेल्या दीपप्रज्वलनाने परिषदेच्या पहिल्या सत्राची सुरुवात झाली. डॉ. व्ही. एन. ब्रिम्सचे संचालक, डॉ. नीतिन जोशी, यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात परिषदेच्या विषयसूत्राचे महत्त्व विशद करून सर्व मान्यवर आणि उपस्थितांचे स्वागत केले.

डॉ.व्ही.एन. ब्रिम्सचे वार्षिक प्रकाशन असलेल्या ''सृजन'' (ISSN २४५६-४०७९) च्या फेब्रुवारी २०२३ या ८ व्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

ब्रिम्सच्या नेहमीच्या प्रथे प्रमाणे पुढील वर्षीच्या परिषदेचे विषयसूत्र (डीस्ट्रपटिव्ह अँड क्रिटिकल थिंकिंग इन बिसनेस) आणि त्यासंबंधीचे विवेचन, प्रा. क्षितिजा पांडे यांनी जाहीर केले.

यानंतर महासंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी परिषदेच्या विषयसूत्रासंबंधी आपली मते मांडली, तसेच ''डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव्हसाठी'' ब्रिम्स मध्ये सुरू करण्यात आलेल्या नवीन केंद्रासंबंधी माहिती सादर केली.

परिषदेचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि हावरे बिल्डर उद्योगाचे व्यवस्थापकीय संचालक, डॉ. सुरेश हावरे हे होते. त्यांनी आपल्या व्यवसायिक कारकिर्दीत घेतलेले चांगले निर्णय आणि चुकीचे निर्णय याबद्दल खूप उद्बोधक आणि अनुभवसंपन्न मते मांडून उपस्थितांना संबोधित केले.

परिषदेचे मुख्य वक्ते आणि विकफिल्ड फूड्स प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. अश्विनी मल्होत्रा, यांनी आपल्या बीजभाषणात 'व्यवस्थापन शिक्षण आणि उद्योजगता' या विषया संदर्भात विकफिल्ड फूड्स या त्यांच्या वडिलांनी सुरू केलेल्या उद्योगाची यशोगाथा कथन केली, तसेच स्वतः घेतलेल्या व्यवस्थापन शिक्षणाचा झालेला उपयोग, तसेच उद्योग चालविताना आलेले स्वानुभव अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांसंदर्भात विवेचन सादर केले.

यानंतर दूरस्थ माध्यमाद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे) बिझनेस मॉडेल इनोव्हेशन डेनिस ओकले आणि कंपनीचे प्रमुख श्री. डेनिस ओकले यांचे माहितीपूर्ण सत्र झाले. त्यांनी 'नवोन्मेष आणि उद्योजकता' यावर भाष्य केले.

परिषदेच्या निमित्ताने आयोजित केलेल्या परिसंवादामध्ये श्रीमती युक्ती कपूर (संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, एसबीवाय (SBY) अकादमी), श्री. गीतेश धोत्रे (संचालक, युनिकॉर्न हॉस्पिटॅलिटी) आणि श्री. बरुण बसाक (सह-संस्थापक क्राफ्ट अकादमीया प्रा. लि) या मान्यवर, तसेच उद्योजक सदस्यांनी उद्योजकतेबद्दल मनोरंजक आणि फलदायी माहिती सांगितली. श्री. चैतन्य पवार यांनी या चर्चेचे समन्वयन केले.

परिषदेच्या समन्वयक डॉ. स्मिता जपे यांनी पूर्वार्धाच्या सर्व कार्यक्रमाचा गोषवारा व सर्व मान्यवरांचे आभारप्रदर्शन सादर केले व पहिल्या सत्राचा समारोप करण्यात आला.

राष्ट्रीय परिषदेच्या उत्तरार्धात दोन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली, डॉ. ब्रिजेश शर्मा हे या स्पर्धेचे परीक्षक होते. एमएमएस प्रथम वर्षाचे विद्यार्थी चिराग आणि निधी, या प्रश्नमंजुषा स्पर्धेचे विजेते ठरले. तर संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी शोधनिबंध सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षक पद सेंट फ्रान्सिस

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च (SFIMAR) या संस्थेचे प्राध्यापक व उपसंचालक डॉ. जी. रमेश आणि डॉ. पंकज नांदूरकर यांनी भूषविले. प्रा. सिद्धेश सोमण आणि विद्यार्थी श्री. समीर खान हे या स्पर्धेचे विजेते झाले.

परिषदेच्या समारोपाच्या कार्यक्रमात सर्व स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कारांचे वितरण करून परिषदेची सांगता करण्यात आली.




३० जानेवारी ते ४ फेब्रुवारी : सहाय्यक प्रा. विभूती सावे यांनी मुंबई मधील वेलिंगकर इन्स्टिट्यूट (WeSchool) तर्फे आयोजित व एआयसीटीई प्रायोजित "i2We" हा ६ दिवसीय (अल्प-मुदतीचा) ''नेतृत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रम'' यशस्वीरीत्या पूर्ण केला.




६ फेब्रुवारी : बी.एन.बांदोडकर महाविद्यालया तर्फे आयोजित 'मॅथलीट' कार्यक्रमात प्रा.कृष्णकांत लसुणे यांच्या मार्गदर्शनाखाली एमएमएस प्रथम वर्षाचे विद्यार्थी,
- सोनाली पानपाटील हिने फोटोग्राफी स्पर्धेत प्रथम, कु.वृषाली चौहान हिने मेम स्पर्धेत प्रथम व भाग्य देसले याने स्केच स्पर्धेत तृतीय पारितोषिक पटकावले.




६ फेब्रुवारी : प्रा. मुग्धा भडकमकर यांना वाणिज्य आणि व्यवस्थापन विषयात पीएचडी प्रदान करण्यात आली.



९ फेब्रुवारी: डॉ. नीतिन जोशी यांनी पीतांबरी उद्योगाच्या व्यवस्थापकांची विद्यार्थ्यांच्या नियुक्ती आणि व्यवस्थापन विकास कार्यक्रमा (MDP) संदर्भात भेट घेतली. तसेच चेंबूर येथील विवेकानंद एजुकेशन सोसायटीच्या व्यवस्थापन संस्थेला स्थानिक चौकशी समिती सदस्य म्हणून भेट दिली.

१० फेब्रुवारी: डॉ. नीतिन जोशी यांनी कल्याणच्या अचिव्हर्स कॉलेजला स्थानिक चौकशी समिती सदस्य म्हणून भेट दिली.

११ फेब्रुवारी: सहाय्यक प्रा. विभूती सावे यांचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठीचे ''लॉजिस्टिक्स अँड सप्लाय मॅनेजमेंट'' हे पुस्तक विकास पब्लिशिंग हाऊस द्वारे प्रकाशित झाले.

१२ फेब्रुवारी : डॉ. कांचन यांनी एनआयटीटीटी (NITTT) शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे सर्व ८ भाग यशस्वीरीत्या पूर्ण केले.

१२ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी २१ कि.मी. ची हाफ मॅरेथॉन शर्यत पूर्ण केली.

१३ फेब्रुवारी : डॉ. स्मिता जपे यांना के.जी.जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी. बेडेकर महाविद्यालय वाणिज्य येथे संशोधन अनुदानासाठी प्राध्यापकांचे सर्वोत्तम प्रकल्प निवडीसाठी सल्लागार संशोधन समितीच्या बैठकीला आमंत्रित करण्यात आले.




१५ फेब्रुवारी : डॉ. स्मिता जपे यांना, चेंबूर येथील विवेकानंद बिझनेस स्कूल तर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेसाठी परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.



१५ फेब्रुवारी : प्रा. दीप्ती पेरीवाल यांना विवेकानंद बिझनेस स्कूल, मुंबई येथील आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेत सर्वोत्कृष्ट शोधनिबंधाचा पुरस्कार मिळाला.



१५ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी क्रीडा व्यवस्थापन आणि फॅशन डिझाईन कार्यक्रमासाठी स्थानिक चौकशी समिती सदस्य म्हणून अथर्व संस्थेला भेट दिली.

१८ फेब्रुवारी : गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ करिअर एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट तर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद २०२३ मध्ये प्रा.कृष्णकांत लसुणे यांनी 'सोशल मीडिया मार्केटिंगचे बिब्लियोमेट्रिक विश्लेषण' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

१८ फेब्रुवारी : एमएमएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी सोनाली पानपाटील आणि मदिहा खान यांनी प्रा. कृष्णकांत लसुणे यांच्या मार्गदर्शनाखाली गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ करिअर एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट आयोजित आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद २०२३ मध्ये शोधनिबंध सादर केला.



२२ फेब्रुवारी : आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाच्या निमित्ताने; या वर्षीदेखील ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती तर्फे; संस्कृति - बहुविध भाषाओंकी.... या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या दिनाच्या निमित्ताने समिती तर्फे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या मातृभाषेत स्वतःच्या कविता, लेखन पाठविण्याचे, गाणी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला प्रतिसाद देऊन ब्रिम्सच्या विद्यार्थ्यांनी आपल्या स्वरचित कविता भाषण, आपल्या मातृभाषेतील आवडती गाणी व निवेदन सादर करून या कार्यक्रमात आपले भाषिक योगदान दिले.

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी - बेडेकर कला-वाणिज्य महाविद्यालय, ठाणे चे उपप्राचार्य श्री. सुभाष गं. शिंदे यांना या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून

आमंत्रित करण्यात आले होते. इतिहास विषयाचे प्राध्यापक असल्याने त्यांनी अनेक जागतिक, तसेच भारतीय ऐतिहासिक दाखले व नोंदींची माहिती देऊन; देशांच्या संदर्भात, सांस्कृतिक विकास संदर्भात, ऐतिहासिक संशोधनात विविध मातृभाषांचे महत्त्व, तसेच बहुभाषिकतेचे महत्त्व वैयक्तिक विकासा संदर्भात देखील बहुभाषिकता कशी महत्त्वाची आहे इत्यादी संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याबरोबरच जेथे जेथे शक्य आहे तेथे आपल्या मातृभाषांचा वापर करून तिचे जतन करण्याचे आवाहन देखील त्यांनी विद्यार्थ्यांना केले.





२२ आणि २३ फेब्रुवारी : डॉ. दिनेश सोनकुल यांनी ब्रिम्सच्या १२एफ/२बी अंतर्गत नोंदणी संदर्भात दिल्ली येथील यु जी सी कार्यालयाला तसेच एआयसीटीई कार्यालयाला भेट दिली.




२४ फेब्रुवारी : डॉ व्ही एन ब्रिम्सने वाधवानी फाऊंडेशनच्या सहकार्याने एन इ एन इग्नाइट (NEN IGNITE) हा एक उद्योजकता अभ्यासक्रम पूर्ण केला. ''आयडिया डिस्कव्हरी टू पिच डेक'' या संरचनात्मक मार्गाद्वारे नवउद्योजकांना (स्टार्ट-अप) संस्थापकांना समर्थन देणे या उद्देशाने तयार केलेला हा अभ्यासक्रम प्रायोगिक शिक्षणावर आधारित आहे.

१. ब्रिम्स मधून अंदाजे ६० विद्यार्थ्यांच्या संघांनी यात सहभाग घेतला आहे आणि सराव उपक्रम तयार केला आहे.

२. हा अभ्यासक्रम १३ आठवड्यांसाठी आयोजित केला गेला;

३. या दरम्यान विद्यार्थ्यांना ४ टप्पे पूर्ण करायचे होते.

४. या अभ्यासक्रमात १० संघांना (१० सराव उपक्रम) वाधवानी फाऊंडेशनकडून प्रमाणपत्रे प्राप्त झाली. यावर विहित निकषांवर आधारित धाडसी उपक्रम (रिअल व्हेंचर) म्हणून प्रमाणित करून, त्यामध्ये वास्तविक व्यवसाय बनण्याची उच्च शक्यता असण्याचा उल्लेख आहे.

५. ब्रिम्सच्या ई-सेल चे समन्वयक डॉ. पंकज नांदूरकर यांनी प्रा. क्षितिजा पांडे, श्री चैतन्य पवार, आयआयसी आणि एडीसी समिती सह हा उपक्रम राबविला.



CERTIFICATE
OF ACHIEVEMENT

This is to certify that EdSol, a practice venture created as part of Wadhwani Foundation - NEN's programs on entrepreneurship, has been certified by a Global Jury as a **Real Venture** based upon prescribed criteria, with very high prospects to become a real business.

Congratulations to Sneha Gidh, Team member of this venture from Dr. V. N. Bedekar Institute of Management Studies - Thane.

WADHWANI FOUNDATION

Certificate Validation Website: https://cert.wfglobal.org/verify
Certificate Validation Code: mCb1JXHtWo

Sunita Singh
EVP Wadhwani Foundation,
Co-Founder, NEN

२५ फेब्रुवारी: विद्यालंकार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने आयोजित केलेल्या व्हॅन्गार्ड केस स्टडी स्पर्धेच्या परीक्षक म्हणून डॉ. स्मिता जपे यांना आमंत्रित करण्यात आले.

२५ फेब्रुवारी : डॉ. पल्लवी चंदवासकर यांना श्री अंबिका योग कुटीर, ठाणे तर्फे योग नियंत्रण मंडळाच्या योग प्रशिक्षकांसाठी प्रथम स्तर अभ्यासक्रमाचे दूरस्थ माध्यमाद्वारे (ऑनलाइन) ३५ योग प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.


आयुष मंत्रालय, भारत सरकार
Ministry of AYUSH, Govt. of India
Yoga Certification Board
Certificate
MS. PALLAVI CHANDWASKAR
is hereby certified as
Yoga Wellness Instructor
by
The Yoga Certification Board
under
the voluntary certification of yoga professionals,
Ministry of AYUSH, Government of India

२७ फेब्रुवारी : निर्मला मेमोरियल फाऊंडेशन कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्सतर्फे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील शोधनिबंध सादरीकरण स्पर्धेत प्रा. कृष्णकांत लसुणे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.


Nirmala Memorial Foundation
COLLEGE OF COMMERCE & SCIENCE
PERMANENTLY AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI
(Accredited by NAAC with B++ Grade & ISO 9001:2015 Certified)
CERTIFICATE OF APPRECIATION
IS AWARDED TO
Mr. Krishnakant Lasune
For Securing the 2nd Position in National Level Research Paper Presentation Competition on the theme "Problems & Prospects in Functional Areas of Management" organized by the Department of BMS & BAF in association with Internal Quality Assurance Cell of the college on Monday, 27th February, 2023
MS. SWIDDLE D'CUNHA (I/C Principal)
DR. POONAM KAKKAD (IQAC COORDINATOR)

२८ फेब्रुवारी: एमराल्ड प्रकाशनाद्वारे प्रकाशित व स्कोपस अनुक्रमित नियतकालिक युरोपियन जर्नल ऑफ ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट साठी समीक्षक म्हणून डॉ. कांचन अक्षय यांची नियुक्ती करण्यात आली.

२८ फेब्रुवारी: डॉ. दिनेश सोनकुल यांना आयईएस मॅनेजमेंट कॉलेज आणि रिसर्च सेंटर येथे आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी सत्र अध्यक्ष म्हणून आमंत्रित करण्यात आले.



## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाचे माजी विद्यार्थी श्री.आकाश नलावडे आणि श्री.संदिप दळवी यांनी विद्युत अभियांत्रिकी विभागाला भेट दिली. या भेटी दरम्यान त्यांनी विभागातील प्राध्यापकांशी संवाद साधला. सदर भेटीमध्ये अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांशी आपले चालू नोकरीतील अनुभव, तसेच अलीकडे उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधी यावर मार्गदर्शन केले.



दि. १४ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२३ या दरम्यान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने सात दिवसीय विशेष निवासी शिबिर पार पडले. सदर शिबिर गुहागर तालुक्यातील पिंपर गावामध्ये आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने रस्ता दुरुस्ती, ग्रामस्वच्छता, वनराई बंधारा, जिल्हा परिषद शाळेमध्ये ओरिगामी व काही गेम्स, मंदिर परिसर स्वच्छता आणि शिवजयंती आदी उपक्रम पार पडले.



दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील प्रा.प्रीती साठे, स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील प्रा.राजेश परडे यांनी कनिष्ठ

विज्ञान महाविद्यालय पाटपन्हाळे व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय गुहागरला भेट दिली. या भेटीदरम्यान बारावी विज्ञान शाखेतील (PCM) ग्रुपच्या विद्यार्थ्यांना एक महिन्याचा निवासी मोफत सीईटी क्रॅश कोर्स व महाविद्यालयाचे युट्यूब चॅनल या विषयी माहिती देण्यात आली.



दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभाग व संस्थात्मक इनोव्हेशन कौन्सिल (IIC) यांच्या सयुंक्त विद्यमाने 'क्रिएटिव्हिटी आणि इनोव्हेशन (बंदरे आणि सागरी संरचना)' या विषयावर सर्व विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञांचे व्याख्यान संपन्न झाले. श्री. प्रफुल्ल पागनीस यांना या व्याख्यानासाठी संसाधन व्यक्ती म्हणून आमंत्रित होते.



दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील प्लेसमेंट विभागाच्या वतीने एकदिवसीय कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पुणे येथील यु.नो. मिंडा, कायनेटिक ग्रीन प्रा.लि., अहमदनगर, व्हेरॉक, पुणे, सॉफ्ट टेक हब, आबलोली, क्यू स्पायडर, बंगलोर, पी.एच.एन टेक्नोलॉजी, पुणे तसेच भारतभर विस्तार असलेली कोर इंडिया प्रोजेक्ट कंपनी यासारख्या विविध कंपन्या महाविद्यालयात विद्यार्थांचे कॅम्पस मुलाखतसाठी आल्या होत्या. यामध्ये महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक व टेलिकम्युनिकेशन, विद्युत अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, इंस्ट्रूमेंटेशन अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या एकूण ५२ विद्यार्थांनी सहभाग घेतला.

दिनांक २८ फेब्रुवारी व ०१ मार्च २०२३ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाच्या वतीने दोन दिवसीय राष्ट्रीय विज्ञान परिषद आयोजित केली गेली. सदर विज्ञान परिषद 'तंत्रज्ञानामधील उदयोन्मुख प्रवाह' या विषयावर पार पडली. या परिषदेत भारतातील विविध तज्ज्ञ, भाभा अणुसंशोधन केंद्रातील ज्येष्ठ शास्त्रज्ञ, संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते. पहिले व्याख्यान डॉ. सुधाकर आगरकर यांचे होते. त्यांनी स्टीमपासून सेन्सरपर्यंतच्या विविध औद्योगिक क्रांतीचा सामाजिक व आर्थिक परिणाम विशद केला. त्यानंतर डॉ. घोंगे यांनी संशोधकांसाठी आधुनिक तंत्रज्ञानामध्ये असणारी आव्हाने व संधी यांचा उलगडा केला. तमिळनाडू येथील डॉ. संथनम यांनी तंत्रज्ञानामधील गणिताचा वापर व गणिताच्या प्रगतीसाठी लागणारे तंत्रज्ञान याबाबत माहिती दिली. या परिषदेत भाभा अणुसंशोधन केंद्रातील चार ज्येष्ठ शास्त्रज्ञांनी आपले संशोधन सादर केले.



●●●

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

काय आहेत याचा शोध घेत असतात. आपल्याच विश्वात राहणे, धार्मिक बाबींमध्ये स्वतःला गुंतवून ठेवणे, जप-तप करणे, ईश्वराचे नामस्मरण करणे अशा कामात ही मंडळी आपला वेळ घालवतात. अशी माणसे विचारवंत असतात. नवनवीन कल्पना ते मांडत असतात. उत्तम लेखक किंवा उत्तम वैज्ञानिक होण्यासाठी अशा बुद्धिमत्तेची नितांत गरज आहे.

**८. नैसर्गिक बुद्धिमत्ता (Naturalistic Intelligence)**

काही लोक निसर्गप्रेमी असतात. निसर्गात असलेल्या विविध जीवजंतूंचे निरीक्षण करायला त्यांना आवडते. त्यांचे संवर्धन व्हावे यासाठी ते धडपड करीत असतात. तसेच पर्यावरणाचे रक्षण हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. पक्षी निरीक्षण करणे, जंगलात फिरायला जाणे, समुद्रकिनारी भटकंती करणे, गडकिल्ले चढणे अशा कामांत त्यांना आनंद मिळतो. पर्यावरणतज्ज्ञ, जीवशास्त्रज्ञ, निसर्गप्रेमी, पक्षीप्रेमी वगैरे सगळे लोक या गटात येतात.

प्रत्येक व्यक्तीमध्ये वर सांगितलेली बुद्धिमत्ता कमी-अधिक प्रमाणात आढळते. एखादी व्यक्ती चित्रकलेत तरबेज पण गणितात कच्ची असू शकते. प्रत्येक व्यक्तीने आपले बलस्थान काय आहे ते ओळखणे आवश्यक असते. असे करून आपल्या जीवनाची दिशा ठरवली तर यश नक्कीच मिळते. शालेय परीक्षेत यश मिळाले नाही तरीही जीवनाच्या परीक्षेत यश मिळविणारे अनेक लोक आपल्या आजूबाजूला दिसतात. त्यातील काही उत्तम खेळाडू झाले, काही यशस्वी उद्योजक झाले तर काही उत्तम संशोधक झाले याची अनेक उदाहरणे आहेत. शालांत परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून निराश होऊ नये. आपली वाट वेगळी आहे याची जाणीव ठेवून तिचा शोध घ्यावा म्हणजे यश नक्कीच मिळेल.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

# माय मराठी

**मराठी राजभाषा दिनानिमित्त**
**श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज यांना मानवंदना**
**म्हणून स्वरचित काव्यरचना**

मराठी भाषा असे माझी माय
स्वमुखे महिमा वर्णू तिचा काय ।। धृ ।।

महाकाव्य, कथा, कादंबरीने नटली आई
विविध साहित्यकृतींच्या साज ल्यायली
महाराष्ट्राची असे ही शान
राजदरबारी मराठीचा मोठा मान ।। १ ।।

छत्रपती शिवरायांची जन्मभूमी
थोर संत, महात्मा यांची कर्मभूमी
ज्ञानेश्वर माउलीने मांडले पसायदान
क्रांतीज्योती सावित्रीनं मिळवून दिला
मुलींना मान ।। २ ।।

अन्यायाविरुद्ध लढले महात्मा फुले,
डॉ. आंबेडकर
अलंकार असे कुसुमाग्रम, शांता शेळके,
वीर सावरकर
शौर्याची कथा सांगे माती कणाकणांतून
मराठीच्या विजयाची गाथा गाऊ आपुल्या
मनामनांतून ।। ३ ।।

**– सौ. कांचन गणेश मोहिते**
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
प्राथमिक विभाग
नौपाडा, ठाणे

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.